जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा

१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/




जळगाव ■ अंक – १७२ ■ बुधवार दि.१ मे २०२४ संपादिका : सौ. शांता वाणी ■ पाने ६ ■ किंमत ३ रु. ■ RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024-26 lokshahilive@gmail.com

**सोने-चांदी**

- **सोने** (प्रति १० ग्रॅम) : ७३,७६९
- **चांदी** (प्रति १ किलो): ८७०००

**तापमान**

- **कमाल** : ४१ अंश सेल्सिअस
- **किमान** : २० अंश सेल्सिअस

**सुटीची सूचना**

बुधवार दि. १ मे २०२४ रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिन असल्याने दै. लोकशाही कार्यालयास सुट्टी राहिल. गुरुवार दि. २ मे रोजीचा अंक प्रसिद्ध होणारर नाही. याची कृपया आमचे वाचक, विक्रेत, एजंट व जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

– **व्यवस्थापक**

# जिल्ह्यात पंतप्रधान मोदींची तोफ धडकणार!

## पहिल्या आठवड्यात नियोजन : योगी आदित्यनाथांच्या सभेचेही नियोजन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

अठराव्या लोकसभा निवडणूक चौथ्या टप्प्यासाठी जिल्ह्यात दि. १३ मे रोजी मतदान होणार असून भाजपतर्फे पंतप्रधान नद्र मोदी यांच्या सभेचे नियोजन करण्यात येत आहे. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पंतप्रधान नद्र मोदी यांची तोड धडकणार असून उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या सभेचे देखील नियोजन सुरु आहे. भारतीय जनता पक्षातर्फे पंतप्रधान नद्र मोदी यांच्या सभेसाठी प्रयत्न केले जात असून दि. ८ मे रोजी मोदींची सभा होण्याची शक्यता आहे. माघारीनंतर चित्र स्पष्ट झाले असून सारेच पक्ष प्रचारावर भर देत आहे. भाजपने स्टार प्रचारकांना मैदानात उतरविले असून जिल्ह्यात येत्या आठवड्यात मोठ्या नेत्यांच्या सभेचे नियोजन करण्यात येत आहे. भारतीय जनता पक्षाच्या रावेर मतदारसंघाच्या उमेदवार रक्षा



खडसे व जळगावच्या उमेदवार स्मिता वाघ यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नद्र मोदी यांच्या सभेचे आयोजन करण्यात येणार आहे. जळगाव लोकसभा मतदारसंघात भाजपविरुद्ध शिवसेना (उबाठा) असा संघर्ष होणार असून रावेरमध्ये भाजप विरुद्ध राष्ट्रवादी (शरद पवार गट) असा सामना रंगणार आहे. शिवसेनेकडून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व राष्ट्रवादीकडून शरद पवार यांच्या सभेचेही नियोजन करण्यात येत आहे. भारतीय जनता पक्षातर्फे रावेर व जळगावसाठी वरिष्ठ नेत्यांच्या सभांचे नियोजन करण्यात येत असून त्यात पंतप्रधान मोदी यांच्या सभेची मागणी करण्यात आली असून पीएमओ कार्यालयाने जळगावात सभा घेण्याची तयारी दर्शविल्याची माहिती आहे. मोदींसह उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या महायुतीकडून तर महाविकास आघाडीकडून उद्धव ठाकरे, संजय राऊत, सुषमा अंधारे, राष्ट्रवादीकडून शरद पवार, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड यांची तर काँग्रेसतर्फे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात यांच्या सभांचे नियोजन सुरु आहे.

**मोदी घेणार विरोधकांचा समाचार**

जळगाव लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदारांना उमेदवारी नाकारल्याने विरोधकांनी टीकेची झोड उठविली आहे. विरोधकांकडून मोदींवर विखारी टीका होत असून मोदी त्यांना चोख प्रत्युत्तर या सभेच्या माध्यमातून देतील. मोदींच्या या सभेकडे जिल्ह्यावासियांचे लक्ष लागून

# नाशिकचा तिढा सोडवण्यासाठी संकटमोचक महाजन मैदानात

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नाशिक** प्रतिनिधी

महायुतीत नाशिकच्या जागेचा तिढा अद्याप सुटलेला नाही. नाशिकच्या जागेबाबात गेल्या अनेक दिवसांपासून तिढा आहे. नाशिकमध्ये सध्या शिवसेनेचे हेमंत गोडसे हे खासदार आहेत. ते गेल्या १० वर्षांपासून नाशिकचे खासदार आहेत. पण यावेळी त्यांची उमेदवारी धोक्यात आहे. त्यामुळे ते सातत्याने मुंबईत येऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांची भेट घेत आहेत. तरीही नाशिकच्या जागेचा तिढा सुटला नाही. विशेष म्हणजे आधी भाजप, त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडूनही या जागेसाठी दावा करण्यात आला. त्यामुळे हा तिढा आणखी जास्त घट्ट झालाय. पण आता नाशिकच्या जागेचा तिढा सोडण्यासाठी महायुतीच्या नेत्यांकडून





युद्ध पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. विशेष म्हणजे भाजपचे 'संकटमोचक' अशी ख्याती असलेले नेते मंत्री गिरीश महाजन हा तिढा सोडवण्यासाठी मैदानात उतरले आहेत. गिरीश महाजन काल नाशिकमध्ये दाखल झाले आहे. नाशिकमध्ये येताच गिरीश महाजन हे शांतिगिरी महाराजांच्या आश्रमात गेले. इथे गिरीश महाजन आणि शांतिगिरी महाराज यांच्यात बंद दाराआड चर्चा झाली. महाराजांनी माघार घ्यावी, यासाठी गिरीश महाजन यांनी प्रयत्न केले. हिंदू मतं विभागली जाऊ नये यासाठी शांतिगिरी महाराजांना थांबवण्याचा प्रयत्न भाजपकडून करण्यात आला. पण हा प्रयत्न निष्फळ ठरला. कारण गिरीश महाजन आणि शांतिगिरी महाराज यांच्यातील बोलणी फिस्कटली आहे. शांतिगिरी महाराज आपल्या उमेदवारीवर ठाम आहेत. शांतिगिरी महाराज अपक्ष निवडणूक लढणार आहेत. शांतिगिरी महाराजांना भाजपकडून उमेदवारी देणं सध्या शक्य नसल्याचं गिरीश महाजन यांचं मत आहे. मात्र महायुतीच्या उमेदवाराच्या पाठीशी आपण उभे राहावं, अशी महाराजांनी महाराजांना विनंती केली आहे. तर येत्या दोन दिवसात महायुतीच्या उमेदवाराचा तिढा सुटेल, असा महाजन यांचा दावा आहे. गिरीश महाजन यांनी शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांचीदेखील भेट घेतली आहे. दोन्ही नेत्यांमध्ये बंद दाराआड चर्चादेखील झाली आहे. पान २ वर »

# ग्रामस्थांना दारू पाजून भाजपच्या एलईडी व्हॅनला केला विरोध!

## चाळीसगावात उबाठाचे गलिच्छ राजकारण : करण पवारांना झटका बसण्याची शक्यता

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चाळीसगाव** प्रतिनिधी

जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाने प्रचारात आघाडी घेतली असून सर्वत्र उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याने ही बाब शिवसेना उबाठा गटाच्या जिव्हारी लागली असून ते खालच्या पातळीचे राजकारण करीत आहेत. तालुक्यातील गोरखपूर येथे प्रचारासाठी गेलेल्या भारतीय जनता पक्षाच्या एलईडी व्हॅनला एका ग्रामस्थाने विरोध केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. त्यात सदर ग्रामस्थ हा दारूच्या नशेत संबंधित एलईडी व्हॅन चालकाला आमच्या गावात फिरू नका असे सांगत असल्याचे दिसत होता व एक व्यक्ती सदर घटना आपल्या मोबाईलमध्ये चित्रण करत असल्याचे दिसत होते. शिवसेना उबाठा गटाच्या या गलीच्छ राजकारणामुळे उमेदवार करण पवार यांना झटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

तालुक्यातील गोरखपूर येथील घटना अगदी ठरवून कट रचून केली असल्याचे दिसून येत आहे. ज्या व्यक्तीचा हा व्हिडीओ बनवला आहे तो पूर्णत: कट रचून केल्याचे दिसते, याबाबत सकाळी सदर व्यक्ती प्रेमसिंग जाधव यांच्याशी संपर्क केला असता त्याने रात्री काय झाले हे माझ्या लक्षात नसून गावातील उद्धव ठाकरे (उबाठा) गटाच्या कार्यकर्त्याने आम्हाला दारू पाजून विरोध करायला लावला असल्याचे सांगितले. मी भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता असून झालेल्या प्रकाराबद्दल माफी देखील मागितली.यामुळे उबाठा गटाचा गलिच्छ चेहरा उघड झाला असून बनावट कट कारस्थानाच्या माध्यमातून विरोधी पक्षाची बदनामी करण्याचे काम जनतेसमोर आले आहे.

पराभवाच्या भीतीने पायाखालची वाळू सरकलेला उबाठा सेनेने मतदारसंघात असे गलिच्छ राजकारण सुरु केले असून काही दिवसांपूर्वी पोहोरे येथील असाच एकच बनावट व्हिडीओ व्हायरल केला होता. मात्र जनता अश्या

**उबाठा गटाबद्दल संताप**

तालुक्यात असे प्रकार शिवसेना उबाठा गटाकडून होत असून नागरिकांना दारुचे व्यसन लावण्यात येत आहे. आपल्या हितासाठी असे प्रकार ग्रामस्थ खपवून घेणार नाहीत असा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान या घटनेमुळे उबाठा गटाबद्दल तालुक्यात संतापाची लाट उसळली आहे.







## पान १ वरून

**नाशिकचा तिढा**
यावेळी नाशिकच्या जागेबाबत चर्चा झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. गिरीश महाजन आणि अजय बोरस्ते यांच्यात भाजप कार्यालयातचं खलबत झाल्याची माहिती मिळत आहे. विशेष म्हणजे गिरीश महाजन यांनी मंत्री छगन भुजबळ यांचीदेखील भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नाशिकच्या जागेचा तिढा सोडवण्यासाठी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे देखील नाशिक दौऱ्यावर आहेत.

**ग्रामस्थांना दारू**
भूलथापांना व फेक व्हिडीओना बळी पडणार नाही. एकीकडे बंजारा समाजात अनेक साधू संत हे व्यसनमुक्तीसाठी काम करत असून त्यांच्या जनजागृतीमुळे मोठ्या प्रमाणात अनेक व्यक्तींनी व्यसनाचा त्याग केला आहे.

## पान ५ वरून

**मतदानाचा टक्का**
यांचे प्रशिक्षण तहसीलदार नानासाहेब आगळे, बालविकास प्रकल्प अधिकारी देवेंद्र राऊत, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश सोनवणे, नायब तहसीलदार चैताली दराडे यांच्याकडून घेण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ. पल्लवी राऊत, डॉ. दानिश खान, डॉ. नरेश पाटील, बालविकास प्रकल्प अधिकारी शीला पाटील, एस. एस सोनार, भारती भिसे, निशा तेली सर्व गटप्रवर्तक, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. जामनेर तालुक्यात शहरी भागात ८४७ तर ग्रामीण भागात ५८७३ गरोदर मातांचे व शहरी भागात ८४८ स्तनदा माता तसेच ग्रामीण भागात ५१८४ स्तनदा मातांचे मतदान सकाळी ९ वाजेपर्यंत पूर्ण करण्याबाबत नियोजन करण्यात आल्याची माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेश सोनवणे यांनी दिली.

**आगळावेगळा उपक्रम**
आले असून आपल्या भागातील मतदारांची टक्केवारी शंभर टक्के झाल्यास शंभर गुण ८६ते ९५ टक्के मतदान झाल्यास ७५ गुण ८५ टक्के मतदान झाल्यास ५० गुण अशाप्रकारे गुणांकन करण्यात येणार आहे. यात विजेत्यांना प्रथम बक्षीस म्हणून सुवर्ण प्रमाणपत्र द्वितीय बक्षीस म्हणून रजत प्रमाणपत्र तृतीय बक्षीस म्हणून कास्य प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नगरपरिषदेने यासाठी गुगल फॉर्म तयार केला असून या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पारोळा नगर परिषदेच्या वतीने सुभाष थोरात अभिलेख व निवडणूक विभाग प्रमुख चंद्रकांत महाजन सहाय्यक प्रकल्प अधिकारी भूषण महाजन शहर तांत्रिक कक्ष अधिकारी शुभम कंखरे शहर समन्वयक यांचे संपर्क क्रमांक उपलब्ध करून दिले असून संबंधितांनी दिनांक १४ मे २०२४ रोजी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत हा फॉर्म भरणे आवश्यक आहे. त्याकरिता नगरपरिषदेने वर दिलेल्या अधिकाऱ्यांशी संपर्क क्रमांक वरती संपर्क साधावा असे आवाहन पारोळा नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आले आहे. या संपूर्ण उपक्रमासाठी स्थापत्य अभियंता सुमित पाटील राहुल साळवे लेखापाल दीपक महाजन अंतर्गत लेखा परीक्षक श्रीमती यामिनी जटे कर व प्रशासकीय सेवा अधिकारी यांचे विशेष सहकार्य लाभले असे मुख्याधिकारी किशोर चव्हाण यांनी स्पष्ट केले.

**जिल्हा मध्यवर्ती**
यामुळे शेतकरी बँकांकडे वळणार असून जिल्हा मध्यवर्ती बँकेचे शेतकऱ्यांचा कारभारावर विश्वास राहणार नाही. बँक व्यवस्थापन व यांच्यामध्ये शेतकरी भरडला जात आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सोसायटी मिळण्यासाठी अलीकडे भरपूर कागदपत्रांची मागणी करून शेतकऱ्यांना वेठीस धरले जात आहे? असे नियम नव्हते? वक्तशीरपणे सोसायटी भरलेल्या शेतकऱ्याला बँकेकडून कर्ज पुरवठा केला जात होता?अलीकडे मात्र तसेच चित्र दिसत नाही? या संदर्भात स्थानिक संचालकांनी लक्ष घालावे अशी मागणी विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या माध्यमातून हजारो शेतकऱ्यांनी केली आहे.

**विटंबना करणाऱ्या**
शिवाजी शिंदे, सह सचिव विशाल पगारे, संघटक रतन अहिरे, संघटक रवींद्र जाधव, सह सचिव महेंद्र निकम, संघटक सलीम पठाण, संघटक वाहिद पठाण रामा मोरे सचिन जगताप शिवा शहापूरकर घनशाम बागुल मंगेश वाघ अकील शाहा आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

**स्व. मधुकरराव**
माजी गटनेते शेखर पाटील, माजी जि प सदस्य प्रा. नीलिमा पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट ) पक्षाचे फैजपुर शहराध्यक्ष अनवर खाटीक, काँग्रेसचे फैजपूर शहराध्यक्ष रियाज शेख, वसीम जनाब, प्रशांत पाटील, डॉ आर वाय चौधरी, व्ही आर पाटील, एन. ए. भंगाळे यासह महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षातील सन्माननीय पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**साकळी येथे राष्ट्रसंत**
सूत्रसंचालन एन पी पाटील यांनी केले तर आभार सदाशिव पी निळे यांनी मानलेत. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.


ॲड.संदीप पाटील

**जाहिर नोटीस**

**जळगांव येथील मे. ८ वे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दि.कि.अर्ज नं. २८०/२०२४ निशाणी ०७**
**चौकशी तारीख १४/०६/२०२४**
**अर्जदार :-** [१]ज्योती भास्कर काळे, उ. व. ६२,धंदा घरकाम [२] दर्शन भास्कर काळे, उ. व. ६८,धंदा शेती [३] हर्षल भास्कर काळे, उ. व. ३६,धंदा नोकरी, सर्व रा. घर नं. २०३ विठ्ठलपेठ,जळगाव ता. जि. जळगाव
**//विरुध्द//**
कुणीही नाही ..... **सा.वाला**
**अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ व ३ अन्वये वारस दाखला मिळणेसाठी**
जाहीर नोटीस देण्यात येते कि, अर्जदार हे सरनाम्यात दिलेल्या पत्यावर राहत असून **अर्जदार नं. १ यांचे पती तसेच अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल नामे कै. भास्कर अवसू काळे हे दि. २९/०१/२०२४ रोजी मंगलमूर्ती हॉस्पीटल, जळगांव येथे मयत झालेले आहेत.** तसेच **मयत भास्कर अवसू काळे यांची आई हया यापूर्वीच मयत झालेल्या आहेत. भास्कर अवसू काळे यांच्या मृत्यूपश्चात** अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यांचे शिवाय मयतास कोणीही कायदेशीर वारस नाहीत.अर्जदार नं. १ ते ३ हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याने त्यांच्या मृत्युनंतर अर्जदारांना शासकीय, निमशासकीय लाभ तसेच इतर क्षेत्रातील मिळणारे लाभ व सुविधा मिळणेकामी वारस दाखल्याची आवश्यकता असल्यामुळे सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जदार हे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्यात आत त्याने हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्यात आणि उक्त लेखा वरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरील अर्जदारांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबित झाल्यास सदर अर्जदार अर्जदार यांना मयत भास्कर अवसू काळे यांचा वारस दाखला देण्यात येईल.आज दिनांक **३०/०४/२०२४** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

**हुकूमावरुन**
**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर जळगाव**


# एसटी बस आणि ट्रक भीषण अपघातात सहा ठार



न ा श ि क
मुंबई-आग्रा महामार्गावर नाशिक जिल्ह्यातील चांदवडजवळ आज मंगळवारी सकाळी ९.१५ च्या सुमारास एसटी बस आणि ट्रकच्या धडकेत सहा प्रवासी ठार तर सुमारे ३० पेक्षा अधिक जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. जखमींना चांदवड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती चांदवड पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक कैलास वाघ यांनी दिली आहे. सविस्तर वृत्त असे की, जळगाव कडून वसई कडे जाणाऱ्या बसला ओव्हरटेक करण्याच्या नादात समोरून येणाऱ्या ट्रक ने जोरदार धडक दिली, ही धडक इतकी जोरदार होती की, यात एसटी महामंडळाच्या बसचा चकानाचुर झाला असून ६ प्रवाश्यांचा मृत्यू तर ३० पेक्षा अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. अपघातातील सर्व जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघातानंतर मोठी वाहतूक कोंडी झाली होती मात्र चांदवड पोलीस आणि महामार्ग पोलीस घटनास्थळी महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली आहे. महामंडळाच्या बसचा अपघात झाल्यानंतर त्या ठिकाणी मोठी वाहतूक कोंडी झाली होती. त्यावेळी पाचोरा आगारातून नाशिक कडे जाणाऱ्या एसटी बस मधील चालक आणि वाहक यांनी तात्काळ अपघातग्रस्तांना मदत करत रुग्णवाहिकेला फोन लावून बोलावले. जे गंभीर जखमी होते त्यांना धीर देत प्राथमिक उपचार देखील केल्याची माहिती प्रत्यक्षदर्शिंनी दिली आहे. दोन तास सर्व अपघातग्रस्तांना रुग्णालयात पोहचविल्यानंतर चालक आणि वाहक हे नाशिक कडे रवाना झाले. त्यांनी दाखवलेल्या प्रसंगावधनामुळे अनेक प्रवाशांचा जीव वाचण्यास मदत झाली आहे.


जन्म नोंदणीचा जाहिरनामा **जाहीरनामा**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार जळगाव जि.जळगाव यांचे न्यायालयात**

**फौ.कि.अ.नं.१८/२०२४ निशाणी नं. १**
**चौकशी तारीख /०३/२०२४**
ज्याअर्थी अर्जदार श्री मुख्तार अब्दुल बागवान रा. जोशी पेठ, भोई गल्ली जळगांव ता.जि. जळगांव यांनी कायदेशीर जन्म नोंदणी करुन मिळण्यासाठीचा अर्ज मे. कोर्टात केला असून त्या अर्जात अर्जदार यांनी त्यांचा स्वत:चा जन्म दि.०१/०६/१९६६ रोजी जळगाव ता. जि. जळगाव येथे झाला आहे. मात्र अर्जदार यांचा जन्म तारखेची नोंद निबंधक जन्म मृत्यु नोंदणी कार्यालय महानगरपालिका जळगाव शहर ता. जि. जळगांव येथे आढळून आली नाही. म्हणून अर्जदार यांनी सदरचा जन्म नोंद होणेकामी इकडील न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदाराच्या अर्जात नमूद जन्म तारखेची नोंदणी शासकिय निमशासकिय कामासाठी आवश्यक असल्याने अर्जदार यांनी या कोर्टात सदरहु जन्म नोंदणी करुन मिळणेबाबत असा अर्ज केला आहे. सदरहु अर्जदार यांच्या जन्म नोंदणी बात हरकत असल्यास हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखवल्या नाहीत तर सदरहू कोर्ट अर्जदार यांचे मागणीनुसार जन्म नोंदणीबद्दल लागलीच पुराव देवून त्यांची नोंदणी शाबीत दिसल्यास अर्जदाराच्या जन्म नोंदणीबाबत आदेश देण्यात येईल. **आज दिनांक १८/०४/२०२४ रोजी** माझ्या सहीने व मे कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली असे

**आदेशावरुन**
**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार पाचोरा जि. जळगांव**



जन्म नोंदणीचा जाहिरनामा **जाहीर नोटीस**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार पाचोरा जि. जळगाव यांचे न्यायालयात**

**कावि/दंडप्र/८७/२०२४**
**तहसिलदार यांचे कार्यालय पाचोरा**
**दि.१०/०४/२०२४**
**अर्जदार:-** श्री अदिलखान दलशेर खान पठाण, रा. नेरी ता. पाचोरा जि. जळगांव
**//विरुध्द//**
सहा.गटविकास अधिकारी पंचायत समिती पाचोरा ... **सामनेवाला**
ज्यापेक्षा अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंदणी मिळण्यासाठीचा अर्ज मे. कोर्टात केला असून त्या अर्जात **अर्जदार यांची मुलगी नामे - सुरव्याबी अदिलखान पठाण हिचा जन्म दि. ०१/०६/१९९४ रोजी मौजे नेरी ता. पाचोरा जि. जळगाव येथे झाला आहे.** मात्र **जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामपंचायत नेरी ग्रामसेवक नेरी ता. पाचोरा जि. जळगांव यांच्याकडे झालेली नाही.** याबाबत **सहा. गटविकास अधिकारी पंचायत समिती पाचोरा यांचेकडील दाखला सादर केलेला आहे.** म्हणून अर्जदार यांनी त्यांच्या मुलीची जन्माची नोंद होणेकामी इकडील न्यायालयात अर्ज केलेला आहे. **अर्जदाराच्या मुलीची जन्माच्या तारखेची नोंदणी शासकीय /निमशासकीय कामासाठी आवश्यक असल्याने अर्जदार यांनी या कोर्टात सदरहु जन्माची नोंदणी करुन मिळणेबाबत असा अर्ज दाखल केला आहे.** सदरहु अर्जदार यांच्या मुलीच्या जन्म नोंदणी बाबत हरकत असल्यास हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखवल्या नाहीत तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे मागणीनुसार अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म नोंदणीबाबत लागलीच पुरावा देऊन नोंदणी शाबीत दिसल्यास अर्जदाराच्या मुलीच्या जन्म नोंदणीबाबत आदेश देण्यात येईल. **आज दिनांक १०/०४/२०२४ रोजी** माझ्या सहीने व मे कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली असे

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार पाचोरा जि. जळगांव**



जन्म नोंदणीचा जाहिरनामा **जाहीर नोटीस**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार पाचोरा जि. जळगाव यांचे न्यायालयात**

**कावि/दंडप्र/८६/२०२४**
**तहसिलदार यांचे कार्यालय पाचोरा**
**दि.१०/०४/२०२४**
**अर्जदार:-** श्री मोहम्मद गाजी शेख कालु रा.नगरदेवळा ता. पाचोरा जि. जळगांव
**//विरुध्द//**
सहा.गटविकास अधिकारी पंचायत समिती पाचोरा ... **सामनेवाला**
ज्यापेक्षा अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंदणी मिळण्यासाठीचा अर्ज मे. कोर्टात केला असून त्या अर्जात **अर्जदार यांची मुलगी नामे - शाहीन आरा मोहम्मद गाजी हिचा जन्म दि. २८/०२/१९८३ रोजी मौजे नगरदेवळा ता. पाचोरा जि. जळगाव येथे झाला आहे.** मात्र **जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामपंचायत नगरदेवळा ग्रामसेवक नेरी ता. पाचोरा जि. जळगांव यांच्याकडे झालेली नाही.** याबाबत **सहा. गटविकास अधिकारी पंचायत समिती पाचोरा यांचेकडील दाखला सादर केलेला आहे.** म्हणून अर्जदार यांनी त्यांच्या मुलीची जन्माची नोंद होणेकामी इकडील न्यायालयात अर्ज केलेला आहे. **अर्जदाराच्या मुलीची जन्माच्या तारखेची नोंदणी शासकीय /निमशासकीय कामासाठी आवश्यक असल्याने अर्जदार यांनी या कोर्टात सदरहु जन्माची नोंदणी करुन मिळणेबाबत असा अर्ज दाखल केला आहे.** सदरहु अर्जदार यांच्या मुलीच्या जन्म नोंदणी बाबत हरकत असल्यास हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखवल्या नाहीत तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे मागणीनुसार अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म नोंदणीबाबत लागलीच पुरावा देऊन नोंदणी शाबीत दिसल्यास अर्जदाराच्या मुलीच्या जन्म नोंदणीबाबत आदेश देण्यात येईल. **आज दिनांक १०/०४/२०२४ रोजी** माझ्या सहीने व मे कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली असे

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार पाचोरा जि. जळगांव**



जन्म नोंदणीचा जाहिरनामा **जाहीर नोटीस**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार पाचोरा जि. जळगाव यांचे न्यायालयात**

**कावि/दंडप्र/८८/२०२४**
**तहसिलदार यांचे कार्यालय पाचोरा**
**दि.१०/०४/२०२४**
**अर्जदार:-** श्री अदिलखान दलशेर खान पठाण, रा. नेरी ता. पाचोरा जि. जळगांव
**//विरुध्द//**(Advocate-Namdeo Pandurang Koli)
(Candidate of 03 Jalgaon Lok Sabha Constituency)
सहा.गटविकास अधिकारी पंचायत समिती पाचोरा ... **सामनेवाला**
ज्यापेक्षा अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंदणी मिळण्यासाठीचा अर्ज मे. कोर्टात केला असून त्या अर्जात **अर्जदार यांची मुलगी नामे - सलमाबी अदिलखान पठाण हिचा जन्म दि. २७/०७/१९८७ रोजी मौजे नेरी ता. पाचोरा जि. जळगाव येथे झाला आहे.** मात्र **जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामपंचायत नेरी ग्रामसेवक नेरी ता. पाचोरा जि. जळगांव यांच्याकडे झालेली नाही.** याबाबत **सहा. गटविकास अधिकारी पंचायत समिती पाचोरा यांचेकडील दाखला सादर केलेला आहे.** म्हणून अर्जदार यांनी त्यांच्या मुलीची जन्माची नोंद होणेकामी इकडील न्यायालयात अर्ज केलेला आहे. **अर्जदाराच्या मुलीची जन्माच्या तारखेची नोंदणी शासकीय /निमशासकीय कामासाठी आवश्यक असल्याने अर्जदार यांनी या कोर्टात सदरहु जन्माची नोंदणी करुन मिळणेबाबत असा अर्ज दाखल केला आहे.** सदरहु अर्जदार यांच्या मुलीच्या जन्म नोंदणी बाबत हरकत असल्यास हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखवल्या नाहीत तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे मागणीनुसार अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म नोंदणीबाबत लागलीच पुरावा देऊन नोंदणी शाबीत दिसल्यास अर्जदाराच्या मुलीच्या जन्म नोंदणीबाबत आदेश देण्यात येईल. **आज दिनांक १०/०४/२०२४ रोजी** माझ्या सहीने व मे कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली असे

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार पाचोरा जि. जळगांव**



जन्म नोंदणीचा जाहिरनामा **जाहीर नोटीस**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार पाचोरा जि. जळगाव यांचे न्यायालयात**

**कावि/दंडप्र/८५/२०२४**
**तहसिलदार यांचे कार्यालय पाचोरा**
**दि.०८/०४/२०२४**
**अर्जदार:-** श्री शेख शाकीर हुसेन अब्दुल हकीम, मुळ रा.नगरदेवळा ता. पाचोरा जि. जळगाव
**//विरुध्द//**
जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी तथा गटविकास अधिकारी पं. समिती पाचोरा ... **सामनेवाला**
ज्यापेक्षा अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंदणी मिळण्यासाठीचा अर्ज मे. कोर्टात केला असून त्या अर्जात **अर्जदार यांचा सख्खा भाऊ नामे - मोहम्मद नईम अब्दुल हकीम यांचा जन्म दि. ०१/०६/१९८७ रोजी नगरदेवळा ता. पाचोरा जि. जळगाव येथे झाला आहे.** मात्र **अर्जदाराने भावाच्या जन्माच्या तारखेची नोंद जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत नगरदेवळा ता. पाचोरा जि. जळगांव यांच्याकडे केलेली नाही.** अर्जदार यांनी **ग्रामपंचायत नगरदेवळा ता. पाचोरा यांच्याकडे जन्माची नोंद रजिष्टर मध्ये झालेली नाही तसा सहा. गटविकास अधिकारी पाचोरा यांचेकडील दाखला सादर केलेला आहे.** म्हणून अर्जदार यांनी त्यांच्या मुलाची जन्माची नोंद होणेकामी इकडील न्यायालयात अर्ज केलेला आहे. **अर्जदाराच्या सख्खा भावाच्या जन्माच्या तारखेची नोंदणी शासकीय /निमशासकीय कामासाठी आवश्यक असल्याने अर्जदार यांनी या कोर्टात सदरहु जन्माची नोंदणी करुन मिळणेबाबत असा अर्ज दाखल केला आहे.** सदरहु अर्जदार यांच्या सख्खा भावाच्या जन्म नोंदणी बाबत हरकत असल्यास हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखवल्या नाहीत तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे मागणीनुसार अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म नोंदणीबाबत लागलीच पुरावा देऊन नोंदणी शाबीत दिसल्यास अर्जदाराच्या भावाच्या जन्म नोंदणीबाबत आदेश देण्यात येईल. **आज दिनांक ०८/०४/२०२४ रोजी** माझ्या सहीने व मे कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली असे

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार पाचोरा जि. जळगांव**



जन्म नोंदणीचा जाहिरनामा **जाहीर नोटीस**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार पाचोरा जि. जळगाव यांचे न्यायालयात**

**कावि/दंडप्र/८१/२०२४**
**तहसिलदार यांचे कार्यालय पाचोरा**
**दि.१०/०४/२०२४**
**अर्जदार:-** श्री शकील सुभान कहाकर, रा. सामनेर ता. पाचोरा जि. जळगांव
**//विरुध्द//**
सहा.गटविकास अधिकारी पंचायत समिती पाचोरा ... **सामनेवाला**
ज्यापेक्षा अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंदणी मिळण्यासाठीचा अर्ज मे. कोर्टात केला असून त्या अर्जात **अर्जदार यांची मुलगी नामे - फिरदोस शकील कहाकर हिचा जन्म दि. २१/१०/२००५ रोजी मौजे सामनेर ता. पाचोरा जि. जळगाव येथे झाला आहे.** मात्र **जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामपंचायत सामनेर ग्रामसेवक सामनेर ता. पाचोरा जि. जळगांव यांच्याकडे झालेली नाही.** याबाबत **सहा. गटविकास अधिकारी पंचायत समिती पाचोरा यांचेकडील दाखला सादर केलेला आहे.** म्हणून अर्जदार यांनी त्यांच्या मुलाची जन्माची नोंद होणेकामी इकडील न्यायालयात अर्ज केलेला आहे. **अर्जदाराच्या मुलीची जन्माच्या तारखेची नोंदणी शासकीय /निमशासकीय कामासाठी आवश्यक असल्याने अर्जदार यांनी या कोर्टात सदरहु जन्माची नोंदणी करुन मिळणेबाबत असा अर्ज दाखल केला आहे.** सदरहु अर्जदार यांच्या मुलीच्या जन्म नोंदणी बाबत हरकत असल्यास हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखवल्या नाहीत तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे मागणीनुसार अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म नोंदणीबाबत लागलीच पुरावा देऊन नोंदणी शाबीत दिसल्यास अर्जदाराच्या मुलीच्या जन्म नोंदणीबाबत आदेश देण्यात येईल. **आज दिनांक १०/०४/२०२४ रोजी** माझ्या सहीने व मे कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली असे

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार पाचोरा जि. जळगांव**


**चुकीची दुरुस्ती**
दैनिक लोकशाहीच्या दि. ३० एप्रिल २०२४ च्या अंकात पान नं. ३वर नामदेव पांडुरंग कोळी यांचे मार्फत **FORM C-1** हि जाहिरात प्रकाशित करण्यात आली आहे. सदरहु जाहिरातीत मृद्रण दोषामुळ**NAME OF POLITICAL PORT - AKHI BHARAT HINDU MASABHANAI DELHI** असे छापण्यात आले त्या ऐवजी **INDEPENDANT** असे वाचावे.

**– व्यवस्थापक,**
**दै. लोकशाही**


**CHAING IN NAME**
OLD NAME **MOHANKUMAR AMRITLAL LAD** NEW NAME **MOHAN AMRUTLAL LAD** ADD ANAND NAGAR MOHADI ROAD JALGAON



जन्म नोंदणीचा जाहिरनामा **जाहीर नोटीस**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार पाचोरा जि. जळगाव यांचे न्यायालयात**

**कावि/दंडप्र/८२/२०२४**
**तहसिलदार यांचे कार्यालय पाचोरा**
**दि.१०/०४/२०२४**
**अर्जदार:-** श्री ईस्माईल करीम कहाकर, रा. सामनेर ता. पाचोरा जि. जळगांव
**//विरुध्द//**
सहा.गटविका अधिकारी पंचायत समिती पाचोरा ... **सामनेवाला**
ज्यापेक्षा अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंदणी मिळण्यासाठीचा अर्ज मे. कोर्टात केला असून त्या अर्जात **अर्जदार यांची सख्खी पुतणी नामे - नसीम सुभान कहाकर हिचा जन्म दि. ०१/०६/१९७१ रोजी मौजे सामनेर ता. पाचोरा जि. जळगाव येथे झाला आहे.** मात्र **जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामपंचायत सामनेर ग्रामसेवक सामनेर ता. पाचोरा जि. जळगांव यांच्याकडे झालेली नाही.** याबाबत **सहा. गटविकास अधिकारी पंचायत समिती पाचोरा यांचेकडील दाखला सादर केलेला आहे.** म्हणून अर्जदार यांनी त्यांच्या मुलाची जन्माची नोंद होणेकामी इकडील न्यायालयात अर्ज केलेला आहे. **अर्जदाराच्या सख्खी पुतणी ची जन्माच्या तारखेची नोंदणी शासकीय /निमशासकीय कामासाठी आवश्यक असल्याने अर्जदार यांनी या कोर्टात सदरहु जन्माची नोंदणी करुन मिळणेबाबत असा अर्ज दाखल केला आहे.** सदरहु अर्जदार यांच्या मुलीच्या जन्म नोंदणी बाबत हरकत असल्यास हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखवल्या नाहीत तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे मागणीनुसार अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म नोंदणीबाबत लागलीच पुरावा देऊन नोंदणी शाबीत दिसल्यास अर्जदाराच्या मुलीच्या जन्म नोंदणीबाबत आदेश देण्यात येईल. **आज दिनांक १०/०४/२०२४ रोजी** माझ्या सहीने व मे कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली असे **सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार पाचोरा जि. जळगांव**



जन्म नोंदणीचा जाहिरनामा **जाहीर नोटीस**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार पाचोरा जि. जळगाव यांचे न्यायालयात**

**कावि/दंडप्र/८३/२०२४**
**तहसिलदार यांचे कार्यालय पाचोरा**
**दि.०८/०४/२०२४**
**अर्जदार:-** श्री शेख शाकीर हुसेन अब्दुल हकीम, मुळ रा.नगरदेवळा ता. पाचोरा जि. जळगाव
**//विरुध्द//**
जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी तथा गटविकास अधिकारी पं. समिती पाचोरा ... **सामनेवाला**
ज्यापेक्षा अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंदणी मिळण्यासाठीचा अर्ज मे. कोर्टात केला असून त्या अर्जात **अर्जदार यांचा सख्खा भाऊ नामे - श्री अजरोद्दीन अब्दुल हकीम यांचा जन्म दि. १०/०८/१९८८ रोजी नगरदेवळा ता. पाचोरा जि. जळगाव येथे झाला आहे.** मात्र **अर्जदाराने भावाच्या जन्माच्या तारखेची नोंद जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत नगरदेवळा ता. पाचोरा जि. जळगांव यांच्याकडे केलेली नाही.** अर्जदार यांनी **ग्रामपंचायत नगरदेवळा ता. पाचोरा यांच्याकडे जन्माची नोंद रजिष्टर मध्ये झालेली नाही तसा सहा. गटविकास अधिकारी पाचोरा यांचेकडील दाखला सादर केलेला आहे.** म्हणून अर्जदार यांनी त्यांच्या मुलाची जन्माची नोंद होणेकामी इकडील न्यायालयात अर्ज केलेला आहे. **अर्जदाराच्या सख्खा भावाच्या जन्माच्या तारखेची नोंदणी शासकीय /निमशासकीय कामासाठी आवश्यक असल्याने अर्जदार यांनी या कोर्टात सदरहु जन्माची नोंदणी करुन मिळणेबाबत असा अर्ज दाखल केला आहे.** सदरहु अर्जदार यांच्या सख्खा भावाच्या जन्म नोंदणी बाबत हरकत असल्यास हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखवल्या नाहीत तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे मागणीनुसार अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म नोंदणीबाबत लागलीच पुरावा देऊन नोंदणी शाबीत दिसल्यास अर्जदाराच्या भावाच्या जन्म नोंदणीबाबत आदेश देण्यात येईल. **आज दिनांक ०८/०४/२०२४ रोजी** माझ्या सहीने व मे कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली असे

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार पाचोरा जि. जळगांव**



जन्म नोंदणीचा जाहिरनामा **जाहीर नोटीस**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार पाचोरा जि. जळगाव यांचे न्यायालयात**

**कावि/दंडप्र/८४/२०२४**
**तहसिलदार यांचे कार्यालय पाचोरा**
**दि.०८/०४/२०२४**
**अर्जदार:-** श्री मोहम्मद गाजी शेख कालु, मुळ रा. नगरदेवळा ता. पाचोरा जि. जळगांव,ह.मु. खडका रोड भुसावळ ता. भुसावळ जि. जळगांव
**//विरुध्द//**
जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी तथा गटविकास अधिकारी पं. समिती पाचोरा ... **सामनेवाला**
ज्यापेक्षा अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंदणी मिळण्यासाठीचा अर्ज मे. कोर्टात केला असून त्या अर्जात **अर्जदार यांचा मुलगा नामे - शेख इजहार अहमद मोहम्मद गाजी यांचा जन्म दि. २१/०८/१९८७ रोजी नगरदेवळा ता. पाचोरा जि. जळगाव येथे झाला आहे.** मात्र **अर्जदाराने मुलाच्या जन्माच्या तारखेची नोंद जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत नगरदेवळा ता. पाचोरा जि. जळगांव यांच्याकडे केलेली नाही.** अर्जदार यांनी **ग्रामपंचायत नगरदेवळा ता. पाचोरा यांच्याकडे जन्माची नोंद रजिष्टर मध्ये झालेली नाही तसा सहा. गटविकास अधिकारी पाचोरा यांचेकडील दाखला सादर केलेला आहे.** म्हणून अर्जदार यांनी त्यांच्या मुलाची जन्माची नोंद होणेकामी इकडील न्यायालयात अर्ज केलेला आहे. **अर्जदाराच्या मुलाच्या जन्माच्या तारखेची नोंदणी शासकीय /निमशासकीय कामासाठी आवश्यक असल्याने अर्जदार यांनी या कोर्टात सदरहु जन्माची नोंदणी करुन मिळणेबाबत असा अर्ज दाखल केला आहे.** सदरहु अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म नोंदणी बाबत हरकत असल्यास हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखवल्या नाहीत तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे मागणीनुसार अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म नोंदणीबाबत लागलीच पुरावा देऊन नोंदणी शाबीत दिसल्यास अर्जदाराच्या मुलीच्या जन्म नोंदणीबाबत आदेश देण्यात येईल. **आज दिनांक ०८/०४/२०२४ रोजी** माझ्या सहीने व मे कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली असे

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार पाचोरा जि. जळगांव**

# जागतिक कामगार दिन : कामगारांचा हक्काचा दिवस १ मे




१ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. जगभरातील कामगारांचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. केवळ भारतातच नाही तर जगभरातील ८० हुन अधिक देशात या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. १९ व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर जगभरातील कामगारांना रोजगार मिळू लागला. रोजगार मिळाला पण कामगारांची पिळवणूक मात्र वाढली. कोणत्याही सुविधा न देता तुटपुंजी मजुरी देत कामगारांना १२ ते १४ तास राबवून घेण्यात येऊ लागले. त्यामुळे कामगारात असंतोष निर्माण झाला. या असंतोषातूनच कामगार एकत्र आले व कामगार संघटनांची निर्मिती झाली. या संघटनांनी कामगारांची पिळवणूक थांबवण्यासाठी काही ठराव केले. त्या ठरावात केलेल्या प्रमुख मागण्या..

१) कायद्याने आठ तासांचा दिवस
२) लहान मुलांना कामावर लावण्यास बंदी
३) महिला कामगारांच्या कामावर मर्यादा
४) रात्रीचे व धोक्याचे काम यासाठी खास नियम
५) कायद्याने साप्ताहिक सुट्टी
६) कामाचा मोबदला वस्तूरूपाने न देता नगद द्यावा
७) समान कामासाठी समान वेतन

या मागण्या २१ एप्रिल १८५६ रोजी ऑस्ट्रेलियातील कामगारांकडून करण्यात आल्या. ऑस्ट्रेलियातील कामगारांच्या मार्गाने जात अमेरिका व कॅनडातील संघटनांनी १ मे १८८६ रोजी मोर्चे व धरणे आंदोलनाची सुरवात केली. अशाच एका मोर्चाला पांगवताना ४ मे १८८६ रोजी झालेल्या गोळीबारात १ आंदोलनकारी ठार झाला. त्याचा निषेध म्हणून जगभरातील कामगार संघटना रस्त्यांवर उतरल्या. त्यात एका अज्ञात व्यक्तीने पोलिसांवर बाँब टाकला. यात ८ पोलीस मृत्यू पावले, तर ५० पोलीस जखमी झाले. या घटनेच्या स्मरणार्थ १ मे १८८९ रोजी आंतरराष्ट्रीय आंदोलनाचे आयोजन करण्याची मागणी रेमंड लेविन याने पॅरिस येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत केली. त्या परिषदेत १ मे १८९० हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित झाले. १८९१ च्या दुसऱ्या परिषदेत १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याची औपचारिक घोषणा करण्यात आली. तेंव्हापासून १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून जगभरात उत्साहात साजरा केला जातो. १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय ऐक्याचा, स्वातंत्र्याचा, मानवाकडून मानवाचे होणाऱ्या पिळवणुकीचा अंत करण्याचा प्रतीक बनला आहे. १९०५ च्या १ मे या कामगार दिनाच्या पत्रिकेत लेनिनने लिहिले आहे, '' कामगार - कामगारात, राष्ट्रा - राष्ट्रात, धर्मा - धर्मात असणारे शत्रुत्व नष्ट करा. या शत्रुत्वाने फक्त लुटारुंचा आणि जुलूमशहांचा फायदा होतो. कारण ते कामगार वर्गातील अज्ञातावर आणि दुफळीवरच जगत असतात. ज्यू आणि ख्रिश्चन, फिन आणि स्वीडिश, आर्मेनीयम आणि तातार, पोलिश आणि रशियन, लॅटिन आणि जर्मन असे सारे भेदभाव विसरून समाजवादाच्या झेंड्याखाली आपण सारे आगेकूच करूया. सर्व देशातील कामगारांची ही ऐक्य शक्ती आंतरराष्ट्रीय समाजवादाची संघशक्ती १ मे ला आपल्या दलाची पाहणी करते आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यासाठीचा लढा निर्धाराने आणि अविचलपणे पुढे नेण्यासाठी आपले बळ संघटित करते.'' लेनिनचा हा विचार घेऊन जगभरातील कामगार संघटना आज मार्गक्रमित करीत आहेत. आज जगभरातील कामगार संघटनांपुढे नवे आव्हाने आहेत. जागतिकीकरणाची लाट व २१ व्या शतकातील कामगारांचे प्रश्न, बदललेली परिस्थिती, मस्तवाल झालेले भांडवलदार या नव्या आव्हानांचा मुकाबला कामगार संघटनांना करावा लागणार आहे. काळाचे हे आव्हान कामगार संघटनांनी स्वीकारले पाहिजे. जनतेच्या जगण्याला व कामगारांच्या हक्काला मिळालेले हे आव्हान आहे. याचा मुकाबला संघटित व असंघटित कामगारांच्या एकजुटीनेच होऊ शकतो. कामगार एकजुटीचा विजय असो! जगभरातील कामगारांना कामगार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

# 'महाराष्ट्र दिना'चा इतिहास आणि महत्त्व




महाराष्ट्र दिन हा महाराष्ट्र राज्याचा निर्मिती दिवस म्हणून साजरा केला जातो. १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. हा दिवस मराठी माणसाचा आहे आणि तो मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी बलिदान दिलेल्या १०६ हुतात्म्यांचे स्मरण आजच्या दिवशी केले जाते.

१ मे १९६० रोजी अनेक राज्याच्या विभाजनापासून महाराष्ट्र राज्य स्थापन केले गेले. १ मे रोजी म्हणजेच आजच्या दिवशी महाराष्ट्र दिन हा महाराष्ट्र राज्याची निर्मिती दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवशी राज्यात सार्वजनिक सुट्टी असते. शिवाय हा दिवस कामगार दिवस म्हणूनही साजरा केला जातो. या दिनी महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांचे स्मरण केले जाते. महाराष्ट्र दिनाचा इतिहास २१ नोव्हेंबर इ.स.१९५६ दिवशी फ्लोरा फाऊंटनच्या परिसरात तणावाचे वातावरण होते. कारण राज्य पुनर्रचना आयोगाने महाराष्ट्राला मुंबई देण्याचे नाकारले त्यामुळे मराठी माणसं प्रचंड चिडली होती. सर्वत्र छोट्यामोठ्या सभांमधून या निर्णयाचा निषेध होत होता. या संगठनामुळे कामगारांचा एक विशाल मोर्चा सरकारचा निषेध करण्यासाठी फ्लोरा फाऊंटनसमोरील चौकात येण्याचे नियोजन झाले. त्यानंतर प्रचंड जनसमुदाय एका बाजूने चर्चगेट स्थानकाकडून आणि दुसऱ्या बाजूने बोरीबंदरकडून गगनभेदी घोषणा देत, फ्लोरा फाऊंटनकडे जमला. मोर्चा पोलिसी ताकद वापरून उधळून लावण्यासाठी लाठीचार्ज करण्यात आला. मात्र सत्याग्रहींमुळे पोलिसांचे हे प्रयत्न अयशस्वी झाले आणि पोलिसांना गोळीबाराचा आदेश मुंबई राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्याद्वारे देण्यात आला. गोळीबार झाला आणि संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात १०६ आंदोलक हुतात्मे झाले. या हुतात्म्यांच्या बलिदानामुळे आणि मराठी माणसाच्या आंदोलनामुळे सरकारने नमते घेऊन १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना केली. १०६ आंदोलकांचे हौतात्म्य स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्मितीची प्रक्रिया सुरू होती. मात्र, राज्य पुनर्रचना आयोगाने मुंबई महाराष्ट्राला देण्यास नकार दिला होता. त्यामुळे मुंबई मराठी माणसांपासून तोडली जात असल्याची एक चीड त्यावेळ धुमसत होती. त्यामुळे २१ नोव्हेंबर १९५६ रोजी सरकारचा निषेध करण्यासाठी कामगारांनी एक मोर्चा काढला. यावेळी आंदोलकांच्या संयुक्त महाराष्ट्राच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. पोलिसांना हा मोर्चा आवरणे कठीण झाले. त्यामुळे पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्ज केला. परंतु,जमाव पांगला नाही. त्यामुळे मुंबई राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी गोळीबाराचे आदेश दिले. पोलिसांनी गोळीबार केला आणि या गोळीबारात १०६ आंदोलकांना हौतात्म्य आले.

# महाराष्ट्राच्या जडणघडणीत संतवाङ्मयाचे योगदान !




तेराव्या शतकात मुस्लीम आक्रमणाची पहिली धाड देवगिरीवर कोसळल्यापासून ते सतराव्या शतकातील औरंगजेबाच्या शेवटच्या स्वारीपर्यंत महाष्ट्रावर जी आक्रमणे झाली, त्यातून महाराष्ट्राने आपले स्वतःचे डोके तर वर काढलेच; पण पुढे भगवा झेंडा अटकेवर रोवून सर यदुनाथ सरकार यांनी म्हटल्याप्रमाणे 'हिंदवी राष्ट्राचा माथा सर्व जगाला उन्नत करून दाखवला.'

हा जो भीमपराक्रम महाराष्ट्राने केला, त्याला संतांनी उत्पन्न केलेला आध्यात्मिक आत्मप्रत्यय बर्याच अंशी प्रेरक झाला, हे निःसंशय ! किंबहुना सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात शिवछत्रपतींनी स्वराज्य स्थापनेच्या महान कार्याला जो शुभारंभ केला, त्याची पार्श्वभूमी, श्री तुकाराम महाराजांच्या यथार्थ शब्दांत सांगावयाची म्हणजे, या 'वैष्णववीरां'नी तयार केल्यामुळेच भरत खंडातील राष्ट्रकात महाराष्ट्राचा इतिहास हा स्वातंत्र्यस्फूर्तीचे निधान होऊन बसला.

अर्थात तेराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत पारतंत्र्याच्या त्या घनतिमिरात निर्माण झालेल्या नामदेव, ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम आणि रामदास स्वामी या संतकवींचे वाङ्मय हे महाराष्ट्राचे अद्भुत अमोल संचितच आहे.

अद्भुत या अर्थाने की, लोकस्थिती नासू द्यावयाची नाही आणि लोकसंस्थेचे रक्षण करावयाचे, अशा दुहेरी उद्देशाने उत्पन्न करण्यात आलेले असे एकरस, एकवीर आणि एकसंध वाङ्मय नामदेवरायांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे 'ब्रह्मरसाचा हा सागरू' जगातल्या कोणत्याही दुसर्या भाषेत आढळणार नाही. त्यादृष्टीने 'समाधिधन' असा जो शब्द भावार्थदीपिकेच्या उपसंहारात ज्ञानदेवांनी तिच्यासंबंधी योजलेला आहे, तो या सर्वच वाङ्मयाला लागू पडतो; कारण एका विशिष्ट जीवननिष्ठेच्या ध्यासातून, आत्मप्रत्ययाच्या उन्मनीतून आणि ध्येयाच्या समाधीतून हे वाङ्मय आविर्भूत झाले आहे. ते अमोल या अर्थाने आहे की, तत्त्वचिंतन आणि हृदयसंवाद या दोहोंचाही मनोज्ञ संगम होय. ज्यात पडलेले आपले भव्य प्रतिबिंब पाहून महाराष्ट्राच्या अस्मितेने, आत्मानुभूतीच्या आनंदाने आणि आत्मप्रत्ययाच्या स्फूर्तीने सदैव कर्तव्यरत राहावे. असे हे संचित आपल्याला लाभल्यामुळेच आपण मुस्लीम आणि ब्रिटीश आक्रमणावर मात करून पुन्हा राष्ट्र म्हणून स्वाभिमानाने उभे राहू शकला.

# महाराष्ट्राबद्दल या ६० गोष्टी ठाऊक आहेत का?

आज एक मे १९६० साली आजच्याच दिवशी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली होती. करोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी या वर्षी राज्यातील महाराष्ट्र दिन हा कार्यक्रम अत्यंत साधेपणाने आयोजित करण्याबाबत राज्य शासनाने निर्देश दिलेले आहेत. आजच्या ६० व्या महाराष्ट्र दिनाच्या पार्श्वभूमीवर जाणून घेऊ यात महाराष्ट्राबद्दलच्या ६० खास गोष्टी........

१)महाराष्ट्र हे आकारामानानुसार देशातील तीसरे सर्वात मोठे राज्य आहे.
२) महाराष्ट्राचं क्षेत्रफळ कुवेत, पनामा, फिजी, कतार, ओमान, आर्यलँड, भूतान या देशांपेक्षाही अधिक आहे.
३) लोकसंख्येच्या बाबतीत देशातील दुसरे सर्वात मोठे राज्य आहे.
४) २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ११,२३,७२,९७२
५)महाराष्ट्र राज्यापेक्षा जास्त लोकसंख्या असणारे केवळ ११ देश आहेत.
६)मराठी बोलणाऱ्यांची संख्या सहा कोटी २४ लाख ८१ हजारहून अधिक आहे.
७)महाराष्ट्र हे देशातील सर्वात श्रीमंत राज्य आहे.
८)देशातील पहिली रेल्वे महाराष्ट्रात धावली. १६ एप्रिल १८५३ रोजी पहिली रेल्वे बोरीबंदर ते ठाण्यादरम्यान धावली.
९) महाराष्ट्रात १७ थंड हवेची ठिकाणे आहेत.
१०)महाराष्ट्रातील नवी मुंबई हे जगातील सर्वात मोठं नियोजित शहर आहे
११) महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक रस्ते असणारे राज्य आहे.
१२)ऐतिहासिक संदर्भांमधून इ.स.पूर्व तिसऱ्या शतकापासून महाराष्ट्राबद्दल माहिती मिळते.
१३) प्रमुख भौगोलिक विभाग कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ असे भाग पडतात.
१४) महाराष्ट्राची राजधानी मुंबई तर उपराजधानी नागपूर आहे.
१५)सह्याद्री पर्वतरांगा महाराष्ट्राची ओळख या पर्वतरांगांमधून गोदावरी, नर्मदा आणि कृष्णेसह इतरही अनेक नद्या उगम पावतात.
१६) महाराष्ट्रात एकूण ३६ जिल्हे २०१४ साली अस्तित्वात आलेला पालघर हा सर्वात नवीन जिल्हा.
१७) एकूण राष्ट्रीय औद्योगिक उत्पन्नापैकी १३ टक्के उत्पन्न एकट्या महाराष्ट्रातून होते.
१८) महाराष्ट्रातील प्रमुख उद्योगधंद्यांमध्ये रासायनिक आणि संबंधित उत्पादने, विद्युत आणि साधी यंत्रे, कापड, पेट्रोलीयम आणि तत्सम उद्योगांचा समावेश होतो.
१९) धातू उत्पादने, वाईन, दागिने, औषधे, अभियांत्रिकी सामान, यांत्रिक सामान, पोलाद व लोह उद्योग, प्लास्टिक वायर्स हे महाराष्ट्रातील इतर महत्त्वाचे उद्योगधंदे आहेत.
२०) आंबा, द्राक्षे, केळी, संत्री, गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी आणि कडधान्यासारखी पिके महाराष्ट्रातील प्रमुख पिके आहेत.
२१) महाराष्ट्रातील महत्त्वाच्या नगदी पिकांमध्ये शेंगदाणे, कापूस, ऊस, हळकुंड व तंबाखूचा समावेश होतो.
२२) माहाराष्ट्रातील ३३,५०० चौ. कि.मी. जमीन सिंचनाखाली आहे.
२३) भारतातील चित्रपट आणि दूरचित्रवाणी कार्यक्रमांचे निर्मितीचे प्रमुख केंद्र मुंबई आहे.
२४) भारतातील सर्वात मोठा व आशियातील सर्वात जुना शेअर बाजार मुंबईत आहे.
२५) कोळसानिर्मित व अणुनिर्मित वीज या क्षेत्रात महाराष्ट्राचा देशात प्रथम क्रमांक लागतो.
२६) महाराष्ट्रात अनेक दुर्ग व किल्ले आहेत. रायगड, प्रतापगड, शिवनेरी, व सिंधुदुर्ग ही काही उदाहरणे आहेत.
२७)महाराष्ट्राला ७२० किलोमीटरची किनारपट्टी लाभली आहे.
२८) गोंधळ, लावणी, भारुड, अभंग आणि पोवाडा हे लोकसंगीताचे प्रकार महाराष्ट्रामध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. हे लोकसंगीत महाराष्ट्राची खरी ओळख आहेत.
२९) ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, पु.ल. देशपांडे, प्र.के.अत्रे, व्यंकटेश माडगूळकर असे काही काही प्रमुख लेखक व कवी महाराष्ट्राने देशाला दिले आहेत.
३०) मराठी चित्रपटसृष्टीतील काही प्रसिद्ध व्यक्तिमत्वांची यादी सांगायची झाल्यास व्ही. शांताराम, दादा कोंडके, बाबुराव पेंटर, पु.ल.देशपांडे, अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन पिळगांवकर, महेश कोठारे आणि यांची नावे आवर्जून घ्यावी लागतील.
३१) मराठी नाटकांचा जुना काळ हा कोल्हटकर, खाडिलकर, देवल, गडकरी व किर्लोस्कर आदी लेखकांनी गाजवला.
३२) संगीतनाटके आणि नाट्यसंगीताचा महाराष्ट्राला मोठा वारसा आहे.
३३) बालगंधर्व, केशवराव भोसले, भाऊराव कोल्हटकर व दीनानाथ मंगेशकर या गायक-कलावंतानी एकेकाळी रंगभूमी गाजवली आहे.
३४) कोकणात भात व मासे लोकप्रिय आहेत तर पूर्व महाराष्ट्रात गहू, ज्वारी आणि बाजरी प्रामुख्याने जास्त खाल्ली जाते.
३५) मराठी स्त्रियांचा पारंपरिक वेष हा नऊवारी साडी तर पुरुषांचा पारंपारिक वेष हा धोतर/पायजमा आणि सदरा असा आहे.
३६) दिवाळी, रंगपंचमी, गोकुळाष्टमी व गणेशोत्सव, होळी हे महाराष्ट्राचे मुख्य उत्सव आहेत.
३७) शिवजयंती, वटपौर्णिमा, मकरसंक्रांती, दसरा हे सण देखील उत्साहात साजरे होतात.
३८)स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक सुधारणा व चळवळ व स्त्री शिक्षणाची चळवळ महाराष्ट्रातूनच सुरू झाली.
३९) स्त्री शिक्षणाच्या चळवळीसाठी महात्मा जोतिबा फुले, गोपाळ गणेश आगरकर, धोंडो केशव कर्वे हे अग्रणी होते. या लोकांचे कार्य हे देशातील इतर राज्यांमधील समाज सुधारकांसाठी दिशादर्शक ठरले.
४०)राज्याचा सर्व भाग मान्सून प्रकारच्या हवामानाच्या पट्ट्यात मोडतो.
४१) महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाची (एस.टी) सेवा बहुतेक शहर व खेड्यात उपलब्ध आहे.
४२) एस.टी.चे जाळे महाराष्ट्रभर पसरले आहे विशेषतः ग्रामीण विभागात या बसेस लोकप्रिय आहेत. एस.टी. बस या ग्रामीण महाराष्ट्राची लाइफ लाइन आहे असं म्हटल्यास चुकीचं ठरणार नाही.
४३) महाराष्ट्रात पाच आंतरराष्ट्रीय विमानतळे आहेत.
४४) मुंबई-पुणे द्रुतगतीमार्ग हा भारतातील सर्वात पहिला टोलमार्ग आहे.
४५) मुंबई व न्हावा-शेवा ही महाराष्ट्रातील मोठी बंदरे आहेत.
४६) महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, अमरावती, सातारा या शहरांचा समावेश होतो.
४७) महाराष्ट्रातील लेणी, थंड हवेची ठिकाणे, किल्ले व इतर ऐतिहासिक स्थळांना पर्यटक आवर्जून भेट देतात.
४८) महाराष्ट्र हा भौगोलिक, ऐतिहासिक, धार्मिक, आर्थिक अश्या सर्व दृष्टीने संपन्न आहे.
४९) महाराष्ट्रातील लोणार सरोवर जगभरात प्रसिद्ध आहे. उल्का पडल्याने तयार झालेल्या या सरोवराचे वय ५२ हजार वर्षांहून अधिक आहे.
५०) महाराष्ट्रातील शनीशिंगणापूर येथील घरांना दरवाजे नाहीत. याच कारणामुळे हे देवस्थान जगभरात प्रसिद्ध आहे.
५१) महाराष्ट्रातील नवापूर रेल्वे स्थानकाचा अर्धा भाग महाराष्ट्रात येतो तर अर्धा गुजरातमध्ये येतो.
५२) औरंगाबाद शहर हे प्रवेशद्वारांचे शहर म्हणून ओळखले जाते. या शहराभोवती एकूण ५२ प्रवेशद्वार बांधण्यात आले होते त्यापैकी आज १३ प्रवेशद्वारे सुस्थितीमध्ये आहेत.
५३) देशातील सरकारच्या मालकीचे सर्व सोने हे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नागपूरमधील केंद्रात आहे.
५४) मुंबईमधील लोकल ट्रेनमधून रोज जवळजवळ ६० लाख प्रवासी प्रवास करतात. हा आकडा इस्त्राइलच्या लोकसंख्येहून अधिक आहे.
५५) युनिस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून जाहीर केलेल्या जागांपैकी चार स्थळं महाराष्ट्रात आहेत. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, अजिंठा लेणी, वेरुळ लेणी आणि एलिफंटा लेण्यांच्या यामध्ये समावेश आहे.
५६) शेखरु म्हणजेच या प्राण्याला महाराष्ट्राने राज्य प्राण्याचा दर्जा दिला आहे. तर हिरव्या कबुतराला म्हणजेच राज्य पक्षाचा दर्जा देण्यात आला आहे.
५७) कब्बडी हा राज्याचा प्रमुख खेळ आहे.
५८) महाराष्ट्राच्या हद्दीमध्ये सहा राष्ट्रीय अभयारण्ये आहेत.
५९) केंद्र सरकारला सर्वाधिक रक्कम कराच्या स्वरुपात देणाऱ्या राज्यांच्या यादीमध्ये महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. डिसेंबर २०१९ ला महाराष्ट्राने १३ हजार कोटींहून अधिक रक्कम जीएसटी (वस्तू व सेवा कर) म्हणून केंद्राला दिली आहे.
६०) महाराष्ट्र हा शब्द संस्कृतमधून आल्याचे मानले जाते. संस्कृतमधील 'महा' म्हणजेच महान आणि 'राष्ट्र' म्हणजे देश हे दोन शब्दांना एकत्रित करुन तयार झाला आहे. महाराष्ट्र शब्दाचा अर्थ होतो महान राष्ट्र.


FORMATC-1
Declaration about criminal cases
(As per the judgement dated 25 September 2018 of Hon'ble Supreme Court in WP(Civil) NO.536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)
Name and address of candidate: NAMDEO PANDURANG KOLI
Name of Political Party - ,INDEPENDENT

Name of Constituency - 03 JALGAON LOKSABHA
I Advocate Namdeo Pandurang Koli, a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents;

(A) Pending Criminal cases:

| Sr No | Name of Court | Case Number & Dated | Status of Case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 01. | J.M.F.C.BHUSAWAL | RCC No.309/2007 | Hon'ble High Court Mumbai bench Aurangabad Staved Rule In W.P.(Cri) No.803/2008 with Opponent W.P (Cri.) No.35/2009 | I.P.C.Sec.384, 388,323,504,506,507 Extortion, Extortion by threat or accusation, voluntarily casuing hurt on provocation, Intentional insult to provoke breach of the peace, Criminal Intimidtion, Criminal inti.by anonymous communication. State of Mah. (Dhanraj Vitthal Koli) Vs. Namdeo P. Koli & others. |
| 02. | J.M.F.C.JALGAON | RCC No. 185/2013 | Hon'ble Jt.JMFC Jalgaon. | I.P.C.Sec.415,417,420,34 Cheating & dishonestly inducing delivery of property Sudhakar Gopal Patil Vs. Poornwad Nagari Sah. co.op Credit Sety. & others. |
| 03. | J.M.F.C.JALGAON | RCC No.257/2013 | Hon'ble Jt.JMFC Jalgaon | I.P.C.Sec.406, 420,465,468,34 Cri. Breach of trust, cheating, forgery, forgery of record, forgery for cheating act done by common intention. Mr.shantaram Kolhe Vs. Poornwad Nagari Sah. & othrs |

(B) Details about cases of conviction for criminal offences

| Sr.No. | Name of court & date(s) of order(s) | Description of Offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed. |
|---|---|---|---|
| | Not applicable | Not applicable | Not applicable |

(Advocate-Namdeo Pandurang Koli)
(Candidate of 03 Jalgaon Lok Sabha Constituency)



# मौखिक इतिहास लिखित स्वरुपात मांडणारी साहित्यकृती

## गोर इतिहासातील शूरवीर नायक

बंजारा समाजातील शूरवीरांचा इतिहास मौखिक स्वरुपात थाळी नंगारा या पारंपरिक वाद्यांवर आधारित भजनांवर किंवा पारंपरिक लेंगी आणि बंजारा पारंपारिक गीतातून आणि विविध प्रसंगी भेटीतून मौखिक कथा कथनातून मांडला जात होता. अनेक पिढ्या या शूरवीरांचा इतिहास श्रवण करुन प्रेरणा घेत होत्या.




एकनाथ ल. गोफणे
चाळीसगाव, जि. जळगाव
मो.८२७५७२५४२३

हाच मौखिक इतिहास विविध संदर्भ ग्रंथांचा आधार घेऊन एकत्रित स्वरुपात गोर इतिहासातील शूरवीर नायक पुस्तक रुपात प्रकाशित करण्याचे कार्य, संगत प्रकाशन नांदेड यांच्यामार्फत लेखक याडीकार पंजाब चव्हाण यांनी केलं आणि त्याची प्रथम आवृत्ती २४ ऑक्टोबर २०२३ रोजी प्रकाशित करुन मराठी साहित्यात एक मोलाचे योगदान त्यांनी दिलेलं आहे.

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात बंजारा समाजातील महान शूरवीर योद्ध्यांनी आपले शौर्य, वीरता, साहस धाडस दाखविले, बलिदान दिले. पण इतिहासाने त्यांच्या कार्याची नोंद घेतली नाही ; त्या महान शूरवीर योद्ध्यांना हे पुस्तक त्यांनी अर्पण केले आहे. गोर बंजारा इतिहासातील शूरवीर नायकांची तोंड ओळख व्हावी या निर्मळ हेतूने त्यांनी या पुस्तकाची निर्मिती केलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागात कार्यरत राहून सहाय्यक गटविकास अधिकारी या पदावरून सेवानिवृत्त झालेले पंजाबराव चव्हाण यांनी याडी या आत्मकथनासह अंतस्वर समीक्षा ग्रंथ, सरपंच ग्रामसेवक मार्गदर्शिका आपले संविधान आपले हक्क अशा विविध १४ साहित्यकृती निर्माण केलेल्या असून गोर इतिहासातील शूरवीर नायक हे त्यांचे पंधरावे पुस्तक आहे. त्यांना साहित्य विषयक कार्याबद्दल अनेक सामाजिक गौरव पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहे.




गोर इतिहासातील शूरवीर नायक या पुस्तकाला भीमणीपुत्र मोहन नायक यांनी प्रस्तावना दिलेली असून; एक ऑगस्ट ते ११ सप्टेंबर २०२३ या कालावधीत समाज माध्यमात एकूण ४० शूरवीरांची लेखमाला पंजाबराव चव्हाण यांनी लिहिली होती. त्याचं संकलन पुस्तक रुपात त्यांनी मांडलेले आहे. ज्यामध्ये एकूण १७ प्रकरणांमधून लेखकाने गोर बंजारा समाजाची पार्श्वभूमी, दिल्लीवर राज्य करणारे महान राजा, यासोबत राजा शशांक, राजा भोज, पृथ्वीराज चव्हाण, आला उदल, राजा जयचंद राठोड, हमीर देव चव्हाण, चित्तोडगडची महाराणी, गोरा आणि बादल, संत हातीराम बाबा, राव जोधा, महाराणा कुंभा, राणा सांगा, मानसिंग तोमर, हेमचंद्र विक्रमादित्य राजा मालदेव राठोड, बल्लूनायक बिंजरावत, महाराज गुलाबसिंह, महाराजा रणबीरसिंह आदि योद्यांच्या कार्याची माहिती दिलेली आहे.

आपली भूमिका मांडताना लेखकांनी लोहगडच्या लढाईनंतर मुगल बादशहाने केलेला नर संहार आणि इंग्रज सरकारने या लोकांवर लावलेला गुन्हेगारी जातीचा कायदा आणि त्यामुळे या समाजाची झालेले आर्थिक सामाजिक घसरण याचा परामर्ष घेतलेला आहे.

लेखकाने या पुस्तकाची निर्मिती करत असताना विविध संदर्भ ग्रंथाचा आधार घेतलेला आहे. त्या द्वारे इसवी सन ५९० ते ६२५ या कालावधीतील राजा शशांक यांच्या कार्याचा आढावा. राजा भोज यांच्या कार्याचा आढावा. यासह इतर अनेक वीर योद्ध्यांच्या कार्यावर त्यांनी प्रकाश टाकलेला आहे. या पुस्तकाची निर्मिती करत असताना बंजारा समाजातील सांस्कृतिक बाबींचे दर्शन सुद्धा या माध्यमातून होतं आणि त्या गोष्टी बंजारा बोली भाषेतून त्यांनी मांडलेल्या आहेत.

इतिहासाच्या विविध साधनांचा या पुस्तकांमध्ये उल्लेख आलेला आहे. नागपुरातील शिल्पशिलालेख आहे. वि. पूरातन ग्रंथांमधील संदर्भ सुद्धा या पुस्तकाच्या निर्मितीसाठी वापरण्यात आलेली आहे. प्राचीन मंदिर आणि संग्रहालयांमध्ये ठेवण्यात आलेल्या मुर्त्यांचा सुद्धा संदर्भ या पुस्तकांमध्ये देण्यात आलेला आहे. लोककथा आपल्या भावार्था सह त्यांनी या पुस्तकांमध्ये मांडलेल्या आहे.

हे पुस्तक वाचत असताना वाचकांना विविध राजे त्यांची घराणी आणि त्यांच्या संस्थानांची माहिती एकत्रित स्वरूपात होत असते. अशरफ खान तर्फे बंजारा समाजाचा सुवर्ण अक्षरात ताम्रपत्र देऊन सन्मान केल्याची नोंद सुद्धा या पुस्तकात जंगी भंगी राठोड आणि भगवानदास वडतिया यांच्या कार्याच्या उल्लेखात सापडते.


मारवाड राज्याचा साहसी संरक्षक वीर दुर्गादास राठोड यांच्या कार्यावर स्वतंत्र असे लेखन आणि गुरुगोविंद सिंग शिखांचे दहावे महान धर्मगुरू यांच्या कार्याचा इतिहास या पुस्तकाच्या माध्यमातून लेखकाने मांडलेला आहे. बंजारा समाजातील महान क्रांतिकारी संत सेवालाल महाराज यांच्या कार्याचा शब्दरूपी इतिहास या पुस्तकाची जमेची बाजू आहे. नजीर अकबराबादी यांच्या बंजारा नामाचा संदर्भ या पुस्तकातून वाचकांसमोर येतो.

हा ग्रंथ संक्षिप्त रुपात गोर इतिहासातील शूरवीर नायकांचा आहे. या पुस्तकातील सगळेच शूरवीर गोरमाटी बंजारा आहे असा मुळीच आग्रह लेखकाचा नाही. मात्र या पुस्तकाच्या माध्यमातून पिढ्यान पिढ्या आपल्या शुरवीरांच्या कार्याचे श्रवण करुन प्रेरणा घेणाऱ्या समाज बांधवांना आपल्या वीर योद्धांची माहिती पुस्तक रुपाने करून देण्याचा लेखक पंजाबराव चव्हाण यांचा प्रयत्न कौतुकास्पद आहे. त्यांच्या आगामी काळातील लेखनाला हार्दिक शुभेच्छा.

# माईनमूळाचे लोणचे

माईनमूळाचे लोणचे ही फक्त कोल्हापूरची खासियत आहे. माझ्या मते अन्यत्र कोठेही मिळत नसावीत किंवा मला तरी माहीत नाही कुठे मिळत असेल. परंतू आम्ही खुद्द कोल्हापूरचे असल्याने आमचेकडे घरी दरवर्षीच केले जाते. सर्वानाच आवडते. कोल्हापूरच्या बाजारात साधारण नोव्हेंबर ते फेब्रूवारी या कालावधित ही माईनमूळे मिळतात. या एक प्रकारच्या मूळ्या असतात. तांबूस करडा आल्ल्या सारखा याचा रंग असतो. वरची सालं काढली की आतून पांढरट असतात.

माईनमूळे अत्यंत औषधी असतात. हाडातला जूना ताप (ज्वर) कमी होतो. या लोणच्याच्या कृतीतील सर्वात किचकट भाग म्हणजे माईनमूळ्या साफ करणे. मूळ्याच असल्याने याला माती लागलेली असते. यांचा आकार म्हणजे करंगळी एवढाच असतो व मोठ्या म्हणजे अंगठ्याएवढ्या जाड असतात. गाजरासारख्या लांब असतात पण त्याला अनेक बारिक मूळ्या असतात. लोणचं करायच्या आधी त्या रात्रभर पाण्यात टाकाव्या लागतात. मग दुसरे दिवशी सकाळी त्याची साले काढून म्हणजे बटाटा छिलतो तशा सारी काढाव्या लागतात. नंतर त्याचे उभट तूकडे करायचे. याच्या गोल चकत्या पण करतात, पण उभट तूकडे चावायला जास्त चांगले लागतात. तर असे हे लोणचे प्रत्यक्ष साहीत्य व कृतीसहीत कसे बनवायचे ते पहा.



अपर्णा स्वप्निल कांबळे/नांगरे
मो. ९८९२१३८१३२

**साहीत्यः** माईनमूळे १ किलो, मोहरी डाळ १ वाटी, बारीक मीठ २ वाट्या, लिंबाचा रस १ वाटी (अंदाजे मोठी ८ ते १० लिंबे), हिंग १० ग्रॅम, मेथी २ चमचे, हळदपूड १ चमचा, मिरची पावडर ५ ते ६ टीस्पून, तेल १/२ वाटी, मोहरी २ टीस्पून

**कृतीः** १. प्रथम माईनमूळे साल काढून पूसून कोरडी करून घ्यावित.
२. नंतर त्याचे साधारण एक इंचाचे लांब, मधून उभे चिरून तूकडे करावेत.
३. आता माईनमूळाच्या तूकड्यांवर हिंग, मीठ, हळद, मिरचीपूड व लिंबूरस घालून ठेवा.
४. नंतर मेथी थोड्याशा तेलावर तांबूस तळून घ्या.
५. मोहरी डाळ कोरडीच किंचित गरम करा. ( भाजून नाही घ्यायची) मेथी व मोहरी मिक्सरवर कुटून घ्या.
६. चिरून ठेवलेल्या माईनमूळ्यावर घाला व सर्व एकत्रित नीट हलवा.
७. लोणचे असेच एखाद-दोन दिवस नूसते सर्व मसाला कालवून राहू द्या.
८. फक्त मधून मधून हलवा. रस चांगला सुटतो. ९. नंतर तेल गरम करून हिंग, मोहरी घालून खमंग फोडणी करा. ती पूर्ण थंड करा मग लोणच्यावर ओता व परत एकदा नीट हलवा. लोणचे तयार.
१०. कोरड्या केलेल्या काचेच्या बरणीत तळाला थोडे बारीक मीठ घाला व नंतर लोणचे भरा.

स्वच्छ कोरड्या जागी ठेवून द्या. लागेल तसे थोडे-थोडे लहान बाऊलमधे काढून फार घट्ट वाटले तर किंचित पाणी सैल करण्या साठी घाला व हलवा परत जराशी हवे असल्यास ताजी फोडणी घातली तर जास्त चांगले लागते. अन्यथा तसेच जेवणात खाल्ले तरी चालते. छान लागते.

हे लोणचे, माईनमुळाचे तूकडे करकरीत असताना खायला खूप मजा येते. पण मुरले की तूकडे अंब्याच्या लोणच्यासारखे साधारण मऊ होतात. पण चव छानच असते.

**टीपः** या लोणच्यात तिखटपणा साठी लाल मिरचीपूड ऐवजी हिरव्या मिरचीचे तूकडेही घातले तरी चालते. परंतू लाल तिखटामूळे लोणच्याला लाल रंग छान येतो.







# आम्लपित्त हायपर ॲसिडिटी

आम्लपित्त म्हणजेच हायपर ॲसिडिटी हा आजकाल प्रत्येक घराघरात दिसणारा आजार आहे. परंतु याकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नाही. अनेक लोकांची दिवसाची सुरुवात ही पॅन फोर्टी किंवा जेलुसिल यासारखे औषध घेऊन होते आणि सध्या तर टीव्हीवरही भरपूर जाहिराती दाखवल्या जातात. इनो इत्यादी गोष्टींच्या त्यामुळे अनेक जण ते बिनधास्त घेताना दिसतात. परंतु त्याचा दूरगामी परिणाम शरीरावर होऊ शकतो याचा कोणीही विचार करत नाही. या सगळ्या उपचारांमुळे लाक्षणिक तात्पुरता आराम वाटतो पण पुन्हा लगेचच त्रास सुरू होतो. आम्लपित्त या आजारासाठी आयुर्वेदात खूप छान उपचार सांगितले आहेत. आयुर्वेदानुसार आम्लपित्ताची कारणे लक्षणे व उपचार जाणून घेऊया.



आयुर्वेदानुसार अम्लपित्ताचे दोन प्रकार वर्णन केलेले आहेत. उर्ध्वग अम्लपित्त आणि अधोग अम्लपित्त आता यांची लक्षणे पाहूया. उर्ध्वग अम्लपित्त यामध्ये. .

१) छातीत, घशात जळजळणे, २) मळमळ होणे तोंडाला कडू किंवा आंबट पाणी सुटणे, ३)घशाशी आंबट कडू स्राव येणे, ४)करपट, आंबट, तिखट ढेकर येणे, ५)दात व तोंड आंबणे, तोंड कडू पडणे ६) आंबट कडू घाणेरड्यावासाची उलटी होणे, ७)उलटी द्वारे पित्त पडणे, ८)डोके दुखणे अस्वस्थ वाटणे, ९)छातीत दुखणे, १०) अजीर्ण, अपचन, ११)थकवा येणे, १३)उलटी झाल्यानंतर बरे वाटणे हे लक्षणे दिसतात.

अधोग अम्लपित्त यामध्ये, १) पोटात दुखणे २) जुलाब होणे, ३) गुददाह ४) जुलाब झाल्यावर तात्पुरते बरे वाटणे, ही लक्षणे दिसतात. हा प्रकार तसा कमी पहायला मिळतो. अम्लपित्ताच्या या लक्षणांपैकी अनेक लक्षणं ही बऱ्याच लोकांना दिसत दिसतात परंतु ॲसिडिटी हा तसा गंभीर आजार नाही व त्यामुळे जीवाला धोका नाही हे माहीत असल्याने याकडे सर्रास दुर्लक्ष केले जाते.



डॉ लीना बोरुडे
आयुर्वेदाचार्य, पुणे
फोन ९५११८०५२९८

**आता याची कारणे पाहूया**

वेळीअवेळी खाणे, खूप उशिरा जेवणे भुकेची वेळ टाळल्यावर जेवणे, अति प्रमाणात किंवा अत्यंत कमी खाणे, आंबट तिखट तेलकट मसालेदार बेकरी आंबवलेले जंक फूड नॉनव्हेज जास्त खाणे, अजीर्ण अपचन याकडे दुर्लक्ष करणे, पोट नीट साफ न होणे, रात्री जागरण व दिवसा झोपणे, अपेयपान चहा कॉफी अल्कोहोल इत्यादींचा अतिरेक तसेच सिगारेट गुटखा पान तंबाखू यांचे सतत सेवन, मानसिक ताण तणाव आणि बदललेली जीवनशैली हे सर्व अम्लपित्त होण्यास कारणीभूत ठरतात.

अम्लपित्ताकडे दुर्लक्ष केलं तर त्याची परिणीती गॅस्ट्रिक अल्सर डिओडेनल अल्सर यामध्ये होऊ शकते त्यासाठी एंडोस्कोपी करून पहावे लागते आणि त्याचे उपचारही कठीण होत जातात यासाठी आम्लपित्ताची लक्षणे दिसू लागतात त्यावर योग्य उपाय केले असता पुढील त्रास टाळता येतात जुनाट आम्लपित्तामुळे हाडांची झीज होणे ऑस्टिओस्पोरोसिस सांधेदुखी दातांची झीज हे त्रासही सुरू होतात. यासाठी आम्लपित्ताची लक्षणे दिसू लागतात आहारात योग्य ते बदल करावे वरील सर्व कारणे टाळावीत हेतू टाळले असता आजार वाढण्याला प्रतिबंध होतो. जेवणाच्या वेळा नियमित ठेवाव्यात. रात्रीचे जेवण सात वाजेपर्यंत घ्यावे. जेवणानंतर लगेचच झोपू नये, उशिरा जेवू नये. आहारात काळ्या मनुका, आवळा, कोकम, सुंठ, राजगिरा लाडू, साळीच्या लाह्या, गाईचे दूध तूप लोणी यांचा समावेश करावा. घरी बनवलेले ताजे व गरम जेवण करावे रोज पोट नीट साफ होईल याकडे लक्ष द्यावे रात्री जागरण करू नये आणि दिवसा झोपू नये आयुर्वेदातील शतावरी गुळवेल आवळा या औषधांचा वापर करावा. मोरावळा किंवा आवळा चूर्ण तुपासह घ्यावे. शतावरी कल्प किंवा चूर्ण दुधातून घ्यावे तसेच औषधांमधील अविपत्तिकर चूर्ण, सूतशेखर, त्रिफळा चूर्ण यांचा वैद्यांच्या सल्ल्याने उपयोग करावा. पंचकर्मातील वमन आणि विरेचन यांचा उत्तम फायदा अम्लपित्त होताना दिसतो यामध्ये शरीरात साठलेले दूषित पित्त याद्वारे शरीराबाहेर काढले जाते त्यामुळे लवकरच बरे वाटते. आपली जीवनशैली योग्य ठेवावी व मानसिक ताण तणाव टाळावेत त्यासाठी योग प्राणायाम ध्यान यांचाही रोजच्या दिनक्रमात समावेश करावा.

# अमृतमहोत्सवी भारतात शिक्षणात झालेली डिजिटल क्रांती

### भाग – १

आज भारत जगभरात आयटी हब म्हणुन ओळखला जातोच. तसेच डिजिटल व्यवहारातही भारताने गेल्या काही काळात मोठी झेप घेतली. तेव्हा स्वातंत्र्याची पंचाहत्तरी साजरी करत असताना भारताच्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगती आणि भविष्याचा वेध घेणारा हा लेख.

आगामी काळात मानव सर्वच क्षेत्रांत अफाट प्रगती करेल, यात तीळमात्र शंकाच नाही_२०४० पर्यंत बँका, पोस्ट ऑफिसेस, महाविद्यालये, टेलिफोन एक्सचेंज, मल्टीप्लेक्स कदाचित अस्तित्वातच नसतील अशा या डिजिटल क्रांतीत माणसाचे राहणीमान, जीवनशैली ही पूर्णता बदललेली असेल हे वेगळे सांगायला नको. १ जुलै २०१५ रोजी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ग्रामीण भागांना हाय -स्पीड इंटरनेट नेटवर्क ने जोडणे आणि डिजिटल साक्षरता सुधारणे या उद्देशाने डिजिटल इंडियाची सुरुवात केली.

अमृतमहोत्सवी भारतात शिक्षणांत झालेली डिजिटल क्रांती.

एकविसाव्या शतकात आंतरजालामुळे ज्ञानात प्रचंड भर पडत आहे. यामुळेच ज्ञान हे ठराविक घटकांपुरतेच मर्यादित न राहता ते सार्वत्रिक झाले आहे. दुसऱ्या भाषेत सांगायचे तर ज्ञानाचे सार्वत्रिकीकरण व लोकशाहीकरण झाले आहे. ज्ञानप्राप्तीच्या मार्गातही मोठ्या प्रमाणात बदल झाले आहेत. पुस्तकां ऐवजी डिजिटल पुस्तकां चा (ई-बुक्स) वापर वाढतो आहे. शैक्षणिक तंत्रज्ञानामुळे अध्ययन- अध्यापनाची प्रक्रिया बदलत आहे. शाळांमधील खडू-फळ्याच्या जागी एलसीडी, प्रोजेक्टर, स्मार्ट टीव्ही, रेडियो, टेलिविजन वापराचे प्रमाण वाढत आहे, अनेक शिक्षकानी अध्ययन- अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाची मदत घेण्यास सुरुवात केला आहे - पालक, विद्यार्थी, पर्यवेक्षीय अधिकारी ही शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर करू लागले आहेत. अध्ययन - अध्यापनातच नव्हे तर शैक्षणिक व्यवस्थापन, शैक्षणिक मूल्यमापन आणि शैक्षणिक पर्यवेक्षण यातही माहिती तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढतो आहे.

**डिजिटल माहिती संप्रेषणाची साधने.**

युनेस्कोच्या अहवालात दिल्याप्रमाणे माहिती संप्रेषण तंत्रज्ञान म्हणजे तंत्रज्ञान ( आयसी टी) तंत्रज्ञान विषयक साहित्यांचा असा संच जो माहितीच्या साहित्य निर्मिती, निर्मिती साठवणूक, संक्रमण आणि आदान- प्रदान याचे कार्य करतो अशा तंत्रज्ञान विषयक संगणक, आंतरजाल, वेबसाईट, ब्लॉग, ई -मेल, रेडियो, दूरदर्शन वेबकास्टिंग तसेच साठवणूक यंत्रे, आणि दुरध्वनी म्हणजे लँडलाईन आणि मोबाईल, उपग्रह आणि व्हीडियो कॉन्फरंसिंग अशा तंत्रज्ञान विषयक साहित्याचा यात समावेश आहे.

**शिक्षणक्षेत्रात तंत्रज्ञान**

साऱ्या जगातून मिळविलेल्या, तंत्रज्ञानाचा वापर करताना वापरल्या जाणाऱ्या पद्धती, उपाय, धोरणे, त्यांचे यश अपयश यांच्या कथा, यात खालील मुद्यांचा समावेश आहे.

१)बहु- वाहिनी शिक्षण (मल्टीचैनल लर्निंग )
२)शैक्षणिक दूरदर्शन
३)वेब -आधारीत सुचना
४)शोधासाठी ग्रंथालये
५)विज्ञान व तंत्रज्ञान प्रात्यक्षिके
६)माध्यमांचा (मिडिया) वापर.

भारताची डिजिटल क्रांती इतकी वाढली आहे की भारताने चांद्रयान -३ यशस्वी लॉन्च केले असुन या सर्व मोहिमेचे श्रेय आपल्या भारतीय शास्त्रज्ञांना जाते. यावरुनच भारताच्या डिजिटल क्रांती चे उत्तरोत्तर भाकीत समजते.




अपर्णा स्वप्निल कांबळे/नांगरे
मो. ९८९२१३८१३२


डिजिटल शिक्षण हा भारतासाठी पुढे जाण्याचा मार्ग का?


इंटरनेट सुविधा अधिक परवडणारी आणि सहज उपलब्ध होत असल्याने, डिजिटल व पारंपारिक अध्यापन - शिक्षण माध्यमांचे अधिक अभिसरण होईल. आगामी काळात बाजारात शैक्षणिक संस्थांसाठी विविध प्रकारचे नाविन्यपूर्ण डिजिटल उत्पादने उपलब्ध असतील. देशातील डिजिटल शैक्षणिक बाजाराला चालना देण्यास मदत करणारी धोरणे पुढे आणण्यासाठी सरकारही मूलगामी पावले उचलत आहे. नाविण्यपूर्ण शैक्षणिक साधनांचा वापर सुकर करण्यासाठी देशभरातील डिजिटल पायाभूत सुविधांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. डिजिटल तंत्रज्ञान भाषेच्या सर्व अडथळ्यांना दूर करण्यास देखील मदत करीत आहे. आता शिकण्याची सामग्री प्रादेशिक भाषांमध्ये देखील डिजिटल स्वरूपात उपलब्ध केली जाऊ शकते. ई-लर्निंग आणि एम. लर्निंग उपक्रमांच्या माध्यमातून कोणताही विद्यार्थी किंवा शिक्षक ज्ञान सामग्रीच्या अफाट तलावावर (नॉलेज पूल) जात आहेत. डिजिटल शिक्षण हे भारताचे भविष्य आहे कि जे देशाला सामाजिक- आर्थिक वाढ आणि समृद्धीच्या नवीन शिखरावर नेईल.

डिजिटल शिक्षणास वर्ग आणि ऑनलाइन असे दोन पर्याय आहेत. यापैकी ऑनलाइन शिक्षण हा अधिक फायदेशीर पर्याय असल्याचे प्रथमदर्शनी वाटते. यामध्ये विद्यार्थी आपला गृहपाठ त्वरित पूर्ण करुन छंद जोपासत नोकरीसाठी वेळ काढू शकतात.

डिजिटल शिक्षण -भारतातील शिक्षणाचे भविष्य-: माणसाच्या शिक्षणाची सुरुवात धुळपाटीपासून सुरू होऊन आता डिजिटल पाटीपर्यंत पोहचली आहे. भारतातील डिजिटल शिक्षण हा उपखंडातील भविष्यातील शिक्षणाचा मुख्य चेहरा ठरणार आहे. स्मार्ट तंत्रज्ञानाने देशातील एकूण शैक्षणिक, चौकटीत केलेले बदल पाहुन आश्चर्य वाटते. विशेषता देशाच्या ग्रामीण भागात शिक्षणाची अवस्था चिंताजनक होती. कालबाहय शिक्षण पद्धती, शिसकांची कमतरता, विद्यार्थी-शिक्षकांचे अपूरे गुणोलर आणि अध्यापनाची अपुरी साधने यासारख्या गंभीर आव्हानांना सामोरे जाणारे हे क्षेत्र आहे. तथापि, शिक्षणाचे डिजिटायझेशन करून शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या भागातील विद्यार्थ्यांना एलसीडी स्क्रीन, विडिओ इत्यादी नविन अध्यापन साधनांच्या सहाय्याने शिकविले जात आहे. या भागात डिजिटल शिक्षणाची प्रगती वेगाने होत आहे. परवडण्याजोगे हायस्पीड इंटरनेट आणि डायरेक्ट-टू -डिव्हाईस तंत्रज्ञान ग्रामीण विद्यार्थ्यांना ऑनलाईन अभ्यासक्रम घेण्यास आणि त्यायोगे कौशल्य सुधारण्यासाठी प्रोत्साहित करत आहेत.







संकलन संयोजन
राहुल पवार
८८०६८८६१६६
कविता ठाकरे
९७६५१३६८७५

## आई मला आता तरी..

आई मला आता तरी जन्म घेवू देशील का?
तुझ्या प्रेमाचा, मायेचा उबारा, मला मिळु देशील का?
आई मला आता तरी जन्म घेवू देशील का?

मला माझ्यात तुझीच प्रतिमा, जगाला बघू देशील का?
आई मला आता तरी जन्म घेवू देशील का?
शिक्षण घेण्याची संधी, मला मिळु देशील का?
आई मला आता तरी जन्म घेवू देशील का?

माझ्या शिक्षणातून माझी, प्रगती होवू देशील का?
आई मला आता तरी जन्म घेवू देशील का?
मला इंदिरा गांधी, कल्पना चावला, प्रतिभाताई पाटील
यांच्या सारखी प्रगती करु देशील का?
आई मला आता तरी जन्म घेवू देशील का?

भारत देशाचे नाव लौकीक करण्याची
संधी मला मिळु देशील का?
आई मला आता तरी जन्म घेवू देशील का?
जगातील पुरुष सत्तेची गुर्मी, कमी करण्याची
शक्ती मला मिळु देशील का?
आई मला आता तरी जन्म घेवू देशील का?

माझ्या मायेतुन माझे माहेरचे व सासरचे नाव रोशन,
करण्याची संधी मला मिळू देशील का?
आई मला आता तरी जन्म घेवू देशील का?
तुझ्या प्रेमाचा, मायेचा उबारा, मला मिळु देशील का?



हेमंत वसंतराव चौधरी
चाळीसगाव जि.जळगाव.
मो. ९८९०७०३४८५

# साकळी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती साजरी

लोकशाही न्यूज नेटवर्क
मनवेल प्रतिनिधी

साकळी येथील शारदा विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य आर जे महाजन होते तर व्यासपीठावर पर्यवेक्षक एस जे पवार, बी ई महाजन, आर सी जगताप, जी एल चौधरी, किरणकुमार चौधरी, एस पी निळे भाऊसाहेब, एन पी पाटील, सदाशिव पी निळे, हे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या शुभहस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले.

यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष आर जे महाजन यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनाविषयी ग्रामगीता, भारतीय स्वातंत्र्य, कीर्तनातून समाज प्रबोधन, याविषयी माहिती देऊन मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे

## महत्वाचे

### शिक्षण घेणाऱ्या दहा विद्यार्थ्यांचे मोबाईल लांबवीले

जळगाव–
बाहेरगावाहून जळगावात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्याचे १० मोबाईल अज्ञात चोरट्यांनी लांबविल्याचा प्रकार शाहू नगर येथील सहयोग हौसिंग सोसायटी येथे उघडकीस आला असून याप्रकरणी जळगाव शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
सूत्रांनी दिलेली माहिती अशी कि, जळगाव शहरातील शाहू नगर येथील सहयोग हौसिंग सोसायटीत भुषण राजेंद्र ठाकरे रा. वटार ता. चोपडा या तरूणासह इतर सहकारी राहत असून रविवारी २८ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजेच्या सुमारास घराचे दरवाजे उघडे ठेवून सर्वजण झोपलेले असतांना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या खोलीतून विद्यार्थ्यांचे ७० हजार रूपये किंमतीचे १० मोबाईल चोरून नेल्याचे समोर आले आहे.
ही घटना उघडकीला आल्यानंतर सर्वांनी शोधाशोध केली परंतू कोणतीही माहिती मिळाली नाही. अखेर

# लोहारी बु येथे चंडिका माता मुर्ती प्राणप्रतिष्ठा व मंदिर लोकार्पण

लोकशाही न्यूज नेटवर्क
लोहारी बु प्रतिनिधी

येथे चंडिका माता मुर्ती प्राणप्रतिष्ठा व मंदिर लोकार्पण वरखेडी ता पाचोरा येथुन जवळच असलेल्या लोहारी बुद्रुक येथे दिनांक ०१ मे २०२४ बुधवार रोजी श्री. चंडिका माता मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा, कळसव पुजन व मंदिराचा लोकार्पण सोहळा धर्माचार्य महंत प. पू. श्री. श्री. १००८ महामंडलेश्वर योगिराज दयानंद महाराज (शेलगांव), ब्रम्हचर्य श्री. अडभंगनाथ महाराज (देवराईकर) यांच्या शुभहस्ते व श्री. गणेश बापू महाराज (शेलगावकर), श्री. बापू महाराज बहुळेश्वर महादेव मंदिर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. या श्री. चंडिका माता प्राणप्रतिष्ठा व कळस पूजन सोहळ्याच्या निमित्ताने दिनांक २९ एप्रिल २०२४ सोमवार रोजी लोहारी खुर्द व लोहारी बुद्रुक गावातून श्री. चंडिका माता मुर्तीची ढोल, ताशा, झांज पथकासह सवाद्य भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून दिनांक ३० एप्रिल




२०२४ मंगळवार रोजी श्री. चंडिका माता मुर्तीचे पुजन, होमहवन पुजा व मिती शके १९४६ चेत्रपक्ष वद्य अष्टमी तिथी दिनांक ०१ मे २०२४ बुधवार रोजी ठिक १० वाजून ५१ मिनिटांनी श्री. चंडिका मातेच्या मुर्तीची स्थापना प्राणप्रतिष्ठा सोहळा तसेच कळस पुजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून पालकमंत्री, गिरीश महाजन ग्रामविकास मंत्री, आ. किशोर आप्पा पाटील, माजी आमदार दिलीप वाघ, खा. उन्मेश पाटील खा. ए. टी. नाना पाटील, आ. स्मिता वाघ अमळनेर, वैशाली सुर्यवंशी पाचोरा, करण पवार, गणेश पाटील, अमोल शिंदे, रावसाहेब पाटील, मधुकर काटे, सुभाष मुंडे, डॉ. भरत पाटील, संजय गोहिल, प्रांतसाहेब, पाचोरा विभाग तहसिलदार, पाचोरा विभागीय पोलिस अधिक्षक, पाचोरा हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लोहारी बुद्रुक, लोहारी खुर्द, आर्वे (दत्तनगर), गृप ग्रामपंचायत लोहारी बुद्रुक चे सरपंच, उपसरपंच सदस्य, विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीचे चेअरमन, सदस्य, पंचक्रोशीतील नवतरुण मित्र मंडळ व भाविक भक्त अथक परिश्रम घेत आहेत. या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या सस्नेह निमंत्रण पत्रिका बँक ऑफ महाराष्ट्र शाखा वरखेडी ग्राहक सेवा केंद्र लोहारी बुद्रुकचे संचालक सतिष खैरनार यांनी स्वखर्चाने छापून दिल्या असून याची आकर्षक मांडणी निर्माण कन्स्ट्रक्शन पाचोरा चे कुणाला खैरनार यांनी बनवून दिले आहे.

# जामनेरात आशा व अंगणवाडी सेविका वाढवणार मतदानाचा टक्का

लोकशाही न्यूज नेटवर्क
जामनेर प्रतिनिधी

मा. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर व जिल्हा बालविकास प्रकल्प अधिकारी देवेंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात आरोग्य विभाग व महिला बालकल्याण विभाग हे मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी कामकाज करणार असून प्रत्येक मतदान केंद्रावर माता बाल संगोपन केंद्र व प्रथमोपचार केंद्र



स्थापन करण्यात येणार आहे. रावेर लोकसभा मतदार संघात १३ मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. मतदानाच्या दिवशी तालुक्यातील गरोदर माता, स्तनदा माता, दिव्यांग व जेष्ठ नागरिक यांचा मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी आरोग्य विभाग व महिला बालकल्याण विभागामार्फत जनजागृती करण्यात येत आहे. तालुक्यातील ३२७ मतदान केंद्रावर ३९६ अंगणवाडी सेविका, २७१ आशा स्वयंसेविका तसेच १२६ आरोग्य अधिकारी कर्मचारी यांच्याकडून मतदानाबाबत जनजगृती करून मतदानाचा टक्का वाढवण्याचे तसेच माता बालसंगोपन केंद्र व प्रथोपचार केंद्राचे काम करण्यात येणार आहे. आशा स्वयंसेविका व अंगणवाडी सेविका

पान २ वर »

# मतदान टक्का वाढविण्यासाठी आगळावेगळा उपक्रम

## पारोळा नगरपरिषद मुख्याधिकारी तथा प्रशासक किशोर चव्हाण यांनी केले विविध स्पर्धांचे आयोजन

लोकशाही न्यूज नेटवर्क
पारोळा प्रतिनिधी

पारोळा
देशात सर्वत्र लोकसभेचे वारे वाहत आहेत या सर्वाता मोठ्या लोकशाही उत्साहात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन पारोळा नगरपरिषदे चे मुख्याधिकारी तथा प्रशासक किशोर चव्हाण यांनी केले आहे.

मतदान हे पवित्र दान असून याचे दान प्रत्येकाने केल्यानेच त्याचे पावित्र्य राखले जाईल यासाठी देशाच्या प्रत्येक नागरिकाने आपणास मिळालेला मतदानाचा अधिकार हा हक्क म्हणून बजावलाच पाहिजे. सध्या



लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचे वारे सर्वत्र वाहू लागले आहेत. भारतीय निवडणूक आयोगाच्या वतीने मतदारांनी जास्तीत जास्त मतदान केले पाहिजे यासाठी ठिकठिकाणी मतदान जनजागृती चे विविध उपक्रम या माध्यमातून राबविले जात आहेत.

मतदारांचे मनोधैर्य व सहकार्य वाढवण्यासाठी देशभरात मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जात असून त्या अनुषंगाने पारोळा नगर परिषदेच्या वतीने सुद्धा मतदारांनी स्वतः पुढे येऊन मतदान करावे तसेच मतदारांमध्ये निवडणुकीबाबतीत नवचैतन्य निर्माण करण्यासाठी बाल नाटिका पथनाट्य सभा संमेलने असे आगळे वेगळे उपक्रम नगर परिषदेने हाती घेतले आहेत. या माध्यमातून शहरातील मतदारांची टक्केवारी वाढविण्यासाठी पारोळा नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक किशोर चव्हाण यांनी विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे. शहरातील नागरिकांनी अधिकाधिक मतदान करून आपला हक्क बजवावा लोकशाहीत असणारे एका मताचे मूल्य आपल्या मुलांच्या भविष्या करिता तसेच देश कोणाच्या हातात सोपवावा हे ठरवण्यासाठी सर्वांसाठी खुल्या स्पर्धेचे आयोजन जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी श्री आयुष प्रसाद यांच्या आदेशाने करण्यात आले आहे. या आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत शहरातील विविध गणेश मंडळे दुर्गा उत्सव मंडळ व्यायाम शाळा लायन्स क्लब रोटरी क्लब शहरातील रहिवासी कॉलनी संघ सामाजिक संस्था व्यापारी महासंघ महिला बचत गट पालक संघ राजकीय संस्थांना यात सहभागी करून घेण्यात येत आहे.

या स्पर्धेसाठी गुणांकन ठेवण्यात

पान २ वर »

# गोपाळ प्रल्हाद ठाकरेंचं सिनेसृष्टीत अविस्मरणीय यश!

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

स्वतंत्र वीर सावरकर मराठी आवृत्ती चित्रपटातील ''वंदे मातरम'' या गाण्याच्या स्वरात, रणदीप हूडांच्या साथी गोपाल ठाकरेंनी आपलं संगीतीय पटावर ठसा उमटवला आहे. हे गित विपीन पटवा यांनी संगीतबद्ध केले आहे. हा क्षण आपल्या संपूर्ण मराठी बांधवांसाठी गर्वाचा आणि आपल्या जळगावकरां साठी अत्यंत अभिमानाचा आहे. गोपाल ठाकरेंचं चित्रपट सृष्टीत याआधीही योगदान दिले आहे. मराठी सिनेमा ''तीन अडकून सिताराम'' याच्या मुख्य गाण्यात ''दुनिया गेली तेल लावत'' यामध्ये आपल्या आवाजाची साथ त्याने दिली आहे. या व्यतरिक्त त्याने ३ म्युझिक अवॉर्ड देखील आपल्या नावावर नोंदविले आहेत. गुरुवर्यांच्या आशीर्वादाने आणि त्याच्या अथांग परिश्रमाने हा खडतर प्रवास यशस्वी होण्याच्या मार्गावर लागला आहे. त्याचे हे यश बघता हे आत्ताच्या तरुण पिढीत नक्कीच एक वेगळा



आत्मविश्वास आणि उत्साह निर्माण करू शकतो आपल्यासारखा साधारण कुटुंबातील व्यक्ती सुद्धा योग्य मार्गदर्शन आणि स्वतःच्या विश्वासाच्या बळावर बॉलीवूड सारख्या क्षेत्रात आपली जागा निर्माण करण्याची क्षमता दाखवू शकतो असा विश्वास आपल्याला देतो.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत शेतकऱ्यांचा छळ

लोकशाही न्यूज नेटवर्क
अडावद प्रतिनिधी

शेतकऱ्यांची दगडी बँक, जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यंदा मात्र शेतकऱ्यांचा छळ करीत आहे. सुमारे दीड महिना लोटून गेल्यावरही अद्यापही रेगुलर शेतकऱ्यांना सोसायटीचे पेमेंट मिळाले नसल्याने शेतकरी मेटाकुटीस आलाय.

जिल्हा मध्यवर्ती बँक, सहकार चळवळ मोडीस काढण्याचा प्रयत्न करीत आहे. मार्च अखेरच्या शेतकऱ्यांनी धावपळ करून सोसायटी भरल्या, कुणाकडून पैसे उसनवार घेतले. त्याचे पैसे परत करण्याची वेळ आली तेव्हा मात्र जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक गट सचिवांच्या माध्यमातून रोज नवीन नवीन पत्रक काढून सोसायटी या लांबणीवर टाकत आहे.

पान २ वर »

# विटंबना करणाऱ्या समाज द्रोहींवर कारवाई करा

लोकशाही न्यूज नेटवर्क
चाळीसगाव प्रतिनिधी

आधुनिक भारताचा पाया रचणारे, दलित आदिवासींना मानवतेचा न्याय देणारे, भारतीय स्त्रीला खऱ्या अर्थाने न्याय देणारे, स्व - खर्चाने शाळा स्थापन करून शैक्षणिक क्रांती करणारे, छ. शिवाजी महाराजांची समाधी शोधून, त्यांचे पोवाडा रचून, शिव जयंतीची प्रथा पाडून आम्हाला आमच्या राजाचा



इतिहास अवगत करून देणारे, स्वतंत्र भारताचे खरे राष्ट्रपिता महात्मा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्या समाज द्रोहींना अटक करून कडक करवाई करण्यात यावी अशी मागणी करीत समता सैनिक दलतर्फे राज्याध्यक्ष मा. धर्मभूषण बागुल यांच्या नेतृत्वात चाळीसगाव तहसील निवेदन देण्यात आले. या प्रसंगी जिल्हा सचिव नितीन मरसाळे, जिल्हा संपर्क प्रमुख भाईदास गोलाईत तालुकाध्यक्ष महेंद्र जाधव, तालुका उपध्यक्ष राजू आहिरे, तालुका संपर्क प्रमुख नाना घोडेस्वार, तालुका प्रसिद्धी प्रमुख बाबा पगारे, संघटक

पान २ वर »

# स्व. मधुकरराव चौधरींचे हरितक्रांतीचे स्वप्न रावेर लोकसभा मतदार संघात राबविणार

लोकशाही न्यूज नेटवर्क
फैजपूर प्रतिनिधी

विधानसभेचे माजी अध्यक्ष लोकसेवक स्व. मधुकरराव चौधरी यांच्या फैजपूर येथील पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून रावेर लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार श्रीराम पाटील यांनी अभिवादन केले. तसेच माजी गृहराज्यमंत्री दादासाहेब स्व जे टी. महाजन यांच्या फैजपूर येथील इंजिनिअरींग कॉलेजमधील पुतळ्यास यावेळी अभिवादन करण्यात आला. स्व. मधुकरराव चौधरी यांनी रावेर तालुक्यात जलसिंचनाचे प्रकल्प बांधून पाण्याचा कायमस्वरूपी प्रश्न सोडवला आहे. स्व. चौधरी यांचा आदर्श घेऊन रावेर लोकसभा मतदार संघात शेतीच्या सिंचनाचा प्रश्न



सोडविण्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासन श्रीराम पाटील यांनी दिले. त्यानंतर यावल तालुक्यात मंगळवारी प्रचाराची सुरुवात करण्यात आली. मारुळ येथील नागरिकांशी यावेळी संवाद साधत चर्चा केली. रावेर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने यावल तालुक्यात प्रचार दौऱ्यात सुरुवात झाली. यावेळी रावेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार शिरीष चौधरी, यावलचे माजी आमदार रमेश चौधरी, राष्ट्रवादी काँग्रेसचे रावेर लोकसभा क्षेत्र प्रमुख अतुल पाटील, माजी जि. प सदस्य प्रभाकर सोनवणे, यावल पंचायत समितीचे

पान २ वर »



लोकसभा निवडणूक 2024





# लोकोत्सव



दैनिक लोकशाही

epaper.lokshahilive.com

जळगाव,बुधवार दि.१ मे २०२४


# दक्षिण मुंबई, ठाणे, नाशिकचे अजूनही ठरत नाही!

## महायुतीचा प्रचार खोळंबला : कार्यकर्ते संभ्रमात

लोकशाही न्यूज नेटवर्क
मुंबई प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली असताना महायुतीकडून दक्षिण मुंबई, ठाणे आणि नाशिकसह पाच लोकसभा मतदारसंघात अद्याप अधिकृत उमेदवाराची घोषणा न झाल्याने येथील निवडणूक प्रचार खोळंबला आहे. उमेदवारांच्या नावाची घोषणा नेमकी कधी होणार आणि प्रचार कधी करणार, असा प्रश्न महायुतीच्या कार्यकर्त्यांना पडला आहे. महाविकास आघाडीने उमेदवार जाहीर करून प्रचारात आघाडी घेतली आहे, तर महायुतीच्या कार्यकर्त्यांना अजून उमेदवाराची प्रतीक्षा आहे.

अठराव्या लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात महाराष्ट्रात नाशिक, धुळे, दिंडोरी, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, उत्तर-मुंबई, उत्तर-पश्चिम मुंबई, उत्तर-पूर्व मुंबई, उत्तर-मध्य मुंबई, दक्षिण-मध्य मुंबई आणि दक्षिण-मुंबई अशा १३ मतदारसंघांत येत्या दि. २० मे रोजी मतदान होत आहे. पाचव्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत येत्या तीन मे रोजी संपत आहे. तत्पूर्वी उमेदवार घोषित करून महायुतीला प्रचाराची गती वाढवावी लागणार आहे. महायुतीत भाजप आणि शिवसेना यांच्यात नाशिक, पालघर, ठाणे या तीन जागांवरून रस्सीखेच सुरू आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघात डॉ. श्रीकांत शिंदे हे महायुतीचे उमेदवार असतील, अशी घोषणा भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. त्यामुळे कल्याणबाबतचा संभ्रम दूर झाला आहे. उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघात शिवसेनेला अजून उमेदवार मिळालेला नाही. यामुळे या मतदारसंघात महायुतीच्या प्रचाराचा ठावठिकाणा नाही. याउलट महाविकास आघाडीने आपले उमेदवार घोषित करून प्रचाराला सुरुवात केली आहे.

गेल्या तीन आठवड्यांपासून महायुतीत नाशिकच्या जागेचा तिढा सुटलेला नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांच्या माघारीनंतरही महायुतीत नाशिकच्या जागेचे भिजत घोंगडे आहे. नाशिकचे शिवसेनेचे संभाव्य उमेदवार हेमंत गोडसे आणि अजय बोरस्ते यांनी ठाण्यात अनेक चकरा मारल्या, तरीही येथील उमेदवारी गुलदस्त्यात आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने येथील उमेदवार घोषित करून महिना उलटला असून, राजाभाऊ वाजे यांनी प्रचाराच्या अनेक फेऱ्या पूर्ण केल्या आहेत. पालघरमध्ये मावळते खासदार राजेंद्र गावित महायुतीचे उमेदवार असतील; परंतु, ते भाजपकडून लढणार की शिवसेनेकडून हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. राजेंद्र गावित सध्या शिवसेनेत आहेत.

**ठाणे कुणाचे?**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी प्रतिष्ठेच्या ठाणे लोकसभा मतदारसंघाबाबतही भाजप आणि शिवसेनेत निर्णय होताना दिसत नाही. ठाण्याची जागा शिवसेनेला सुटल्याची चर्चा असून, येथून नरेश म्हस्के यांचे नावे आघाडीवर आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने ठाण्यातून राजन विचारे यांना उमेदवारी दिली आहे.

**उत्तर मुंबईत आघाडी अडली**

महाविकास आघाडीत काँग्रेसला उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघात अजून सक्षम उमेदवार सापडलेला नाही. त्यामुळे उत्तर मुंबईत काँग्रेसला प्रचार रखडला आहे. भाजपने उत्तर मुंबईतून केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांना उमेदवारी दिली आहे.

**शिवसेना उमेदवाराच्या शोधात**

उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदार गजानन कीर्तिकर यांनी निवडणूक लढविण्यास नकार दिल्याने उमेदवारी कुणाला द्यायची, असा प्रश्न मुख्यमंत्री शिंदे यांच्यासमोर आहे. उत्तर पश्चिम मुंबई मतदारसंघात उद्धव ठाकरे गटाने अमोल कीर्तिकर यांना उमेदवारी दिली आहे. दक्षिण मुंबई लोकसभा जागेवर सुरुवातीला भाजप आणि शिवसेना अशा दोघांनी दावा केला होता. भाजपने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि मंत्री मंगलप्रभात लोढा यांना निवडणूक तयारीच्या सूचना केल्या आहेत.

## संजय राऊत हे शिवसेनेचे विदूषक

**नागपूर–**
खासदार संजय राऊत हे राजकारणातील विदूषक आहेत. लोकसभेची निवडणूक असल्याने मनोरंजनासाठी उद्धव ठाकरे आणि शरद पवार हे त्यांचा वापर करीत असल्याचे प्रत्युत्तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते प्रशांत पवार यांनी दिले. लोकसभेच्या निवडणुकीनंतर त्यांचे आम्ही नाक दाबू असाही इशारा राष्ट्रवादीच्यावतीने पत्रपरिषदेत देण्यात आला.

संजय राऊत यांनी अजित पवार यांच्यावर टीका करताना कोयता गँगसोबत त्यांचा संबंध जोडल्याने राष्ट्रवादीचे नेते चांगलेच चिडले आहेत. मागच्या दाराने राज्यसभेत जाणाऱ्या राऊतांना जनतेतून निवडणूक लढवून दाखवावी असे आव्हान त्यांना प्रशांत पवार यांनी दिले. पवार यांची राजकीय उंची, आणि संघटन बांधणी बघता राऊत यांची त्यांच्यावर टीका करण्याचीसुद्धा लायकी नाही.

### भाजपला केंद्रातील सत्तेतून हाकलून लावा : जयंत पाटील बरसले

# जे.पी. गावितांना मते खाण्याचे कंत्राट

लोकशाही न्यूज नेटवर्क
नाशिक प्रतिनिधी

'माकप'चा समावेश इंडिया आघाडीत असतानाही दिंडोरी लोकसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल करणारे जे. पी. गावित यांना भाजपने आपली मते खाण्याचे कंत्राट दिले आहे, अशी टीका राष्ट्रवादी (शरद पवार गट) काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली. आपले मत वाया जाऊ देऊ नका, असे आवाहनही पाटील यांनी मतदारांना केले.

गुजरातच्या पाढंरा कांदा निर्यातीला परवानगी देण्याचा निर्णय अंगलट आल्यानंतर केंद्र सरकारने जुन्याच कांदा निर्यातीची आकडेवारी देऊन शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. देशात लोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू असताना हा जुनाच निर्णय नव्याने घेऊन केंद्र सरकारने आचारसंहितेचा भंग केल्याचा आरोपही पाटील यांनी केला. दरम्यान, महाराष्ट्राला दुय्यम वागणूक देणाऱ्या भाजपला केंद्रातील सत्तेतून हाकलून लावा, अशा शब्दांत महाविकास आघाडीच्या नेत्यांनी भाजपविरोधात हल्लाबोल केला.

महाविकास आघाडीने रॅलीद्वारे शक्तिप्रदर्शन करीत नाशिकमधील महाविकास आघाडीचे उमेदवार पराग उर्फ राजाभाऊ वाजे आणि दिंडोरी लोकसभा मतदारसंघातील उमेदवार प्रा. भास्कर भगरे यांचे उमेदवारी अर्ज भरले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झालेल्या सभेत महाविकास आघाडीतील राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष पाटील, शिवसेना नेते (ठाकरे गट) खासदार संजय राऊत, काँग्रेसचे विधिमंडळ नेते बाळासाहेब थोरात, आमदार सुनील भुसारा यांच्यासह 'मविआ'तील नेत्यांनी केंद्र व राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

दिंडोरीतून 'माकप'चे जे. पी. गावित यांनी अर्ज दाखल केल्याने जयंत पाटील यांनी गावितांवर टीकास्त्र सोडले. महाविकास आघाडीच्या उमेदवाराची मते खाण्यासाठी भाजपने काहींना 'कॉन्ट्रॅक्ट' दिले आहे. सर्व साधने देऊन समोर उमेदवार उभा केला आहे.

**'सरकारकडून शेतकऱ्यांची थट्टा'**

गुजरातच्या कांदा निर्यातीला मुंबईच्या 'जेएनपीटी' बंदराची दारे खुली करून देत महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांची सरकारने थट्टा केल्याचा आरोप जयंत पाटील यांनी केला. केंद्राने कांदा निर्यातीस परवानगी दिल्याचे जुनेच आदेश नव्याने जाहीर करीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची फसवणूक केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मात्र 'ट्विटर'द्वारे पंतप्रधानांचे आभार मानत आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री महाराष्ट्रासाठी काम करतात की गुजरातसाठी, महाराष्ट्रापेक्षा गुजरातचे शेतकरी तुम्हाला महत्त्वाचे वाटतात का, अशा शब्दांत पाटील यांनी राज्यातील महायुती सरकारवर टीकास्त्र डागले.

# देवेंद्र फडणवीसांनी गाठ घालून दिली!



लोकशाही न्यूज नेटवर्क
पुणे प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रातील जागांवर लक्ष केंद्रित करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी प्रचारसभांचा धुरळा उडवला. महायुतीचे पुणे लोकसभेचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मोत्याचा तुरा, शुभचिन्हे व पंचधातूंनी सजवलेली दिग्विजय पगडी भेट दिली. मोहोळ यांच्या संकल्पनेतून मुरूडकर झेंडेवाले यांनी साकारलेली ही पगडी परिधान करूनच मोदी यांनी संपूर्ण भाषण केले. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे सुपुत्र अमित ठाकरे यांची मोदींशी भेट करून दिली. अमित ठाकरे यांच्यासाठी ही संस्मरणीय भेट मानली जाते.

नरेंद्र मोदी यांनी पुणे, सातारा व सोलापूर येथे सोमवारी महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभांमध्ये महाविकास आघाडीतील नेत्यांना धारेवर धरले. 'काँग्रेसला राज्यघटना बदलू देणार नाही', अशी ग्वाही देत 'इंडिया आघाडी'चे लोक ओबीसी आरक्षणाच्या नावाखाली धूळफेक करीत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

# लोकसभेच्या मैदानात 38 उमेदवार रिंगणात!

## जळगावसाठी चौदा तर रावेरात चोवीस उमेदवार : प्रचाराला येणार वेग

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

जळगावसह रावेर लोकसभा निवडणुकीसाठी माघारीच्या अंतिम दिवशी दोघा मतदारसंघात एकूण ३८ उमेदवार रिंगणात राहिले आहेत. जळगाव लोकसभा मतदारसंघात सहा अपक्ष उमेदवारांनी माघार घेतली तर रावेरातून पाच अपक्ष उमेदवारांनी माघार घेतली आहे. जळगाव लोकसभेत १४ तर रावेरात २४ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले असून आता प्रचाराला वेग येणार आहे.

सध्या जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांच्या प्रचाराला वेग आला आहे. दि. १३ मे रोजी जळगाव आणि रावेरमधील निवडणूक पार पडणार आहे. जळगाव व रावेर लोकसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना अर्ज माघारी घेण्याचा सोमवारी शेवटचा दिवस होता. माघारीच्या अंतिम दिवशी जळगावमधून सहा अपक्ष उमेदवारांनी माघार घेतली आहे. यानंतर आता जळगाव लोकसभेत भाजपच्या स्मिता वाघ, शिवसेना ठाकरे गटाचे करण पवार यांच्यासह एकूण १४ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. जळगाव लोकसभेतून संजय एकनाथ माळी, रोहित दिलीप निकम, लक्ष्मण गंगाराम पाटील, डॉ.प्रमोद हेमराज पाटील, संग्रामसिंह सुरेश सूर्यवंशी व प्रदीप शंकर आव्हाड या अपक्ष सहा उमेदवारांनी माघार घेतली आहे. दुसरीकडे रावेर लोकसभेमधून पाच उमेदवारांनी माघारी घेतली आहे.

**प्रचाराला येणार वेग**

माघारनंतर जळगाव व रावेर लोकसभा मतदारसंघाचे चित्र स्पष्ट झाले असून प्रमुख पक्षांचे वरिष्ठ नेत्यांच्या प्रचार सभांचे नियोजन सुरु झाले असून प्रचाराला वेग येणार आहे. भाजपतर्फे जोरदार प्रचार करण्यावर भर देण्यात येत असून पंतप्रधान नद्र मोदी यांच्यासह वरिष्ठ नेत्यांच्या सभांचे नियोजन सुरु झाले आहे.



यामुळे आता येथून भाजप उमेदवार रक्षा खडसे, महाविकास आघाडीचे उमेदवार श्रीराम पाटील व वंचित बहुजन आघाडीचे संजय ब्राह्मणे यांच्यासह एकूण २४ उमेदवार हे निवडणूक रिंगणात आहेत. रावेर लोकसभा मतदारसंघातून शेख रहुब युसुफ, राहुल रॉय, अशोक मूळे, नितीन प्रल्हाद कांडेलकर, शेख कुर्बान शेख करीम नाजमीन शेख रमजान या पाच अपक्ष उमेदवारांनी माघार घेतली आहे.

# वंचितवर अकरा जागी उमेदवार बदलण्याची नामुष्की

## मागेल त्याला तिकीट : सहा ठिकाणी पाठिंबा

लोकशाही न्यूज नेटवर्क
मुंबई प्रतिनिधी

महाविकास आघाडीमध्ये सहभागी होण्यासाठी सुमारे महिनाभर चर्चा केल्यानंतर अखेर स्वबळावर लढण्याचा निर्णय जाहीर करणाऱ्या वंचित बहुजन आघाडीवर आतापर्यंत राज्यात अकरा जागांवरील उमेदवार बदलण्याची वेळ आली आहे, तर पक्षाने स्वतःहून सहा जागांवर इतर उमेदवारांना पाठिंबा दिला असून, त्यातील एका जागेवर तर उमेदवाराचा अर्ज बाद झाल्याने अपक्षाला पाठिंबा देण्याची नामुष्की पक्षावर ओढवली आहे.

'वंचित'ने आतापर्यंत ३६ जागांवर उमेदवार जाहीर केले असून, इतर सहा जागांवर इतरांना पाठिंबा जाहीर केला आहे. जाहीर केलेल्या जागांवर तब्बल ११ जागांवर उमेदवार बदलण्याची नामुष्की पक्षावर आली आहे. सोमवारीच पक्षाने बीना सिंह यांना उत्तर मुंबईची दिलेली उमेदवारी रद्द करून, सोनल गोंडाने यांना उमेदवारी दिली. त्याचबरोबर मुंबई उत्तर-पश्चिम मतदारसंघातून संजीवकुमार कलकोरी यांच्याजागी परमेश्वर रणशूर यांना उमेदवारी देण्यात आली. मुंबई उत्तर-मध्य जागेवरून अबूल हसन यांना उमेदवारी देण्यात आली होती. त्यानंतर त्यांना दक्षिण-मध्य मुंबईतून उमेदवारी देण्यात आली.

रामटेक लोकसभा मतदासंघात 'वंचित'ने शंकर चहांदे यांना उमेदवारी दिली होती. त्यांनी अर्जही भरला होता; मात्र अचानक पक्षाने त्यांना माघार घेण्यास सांगून, त्याच जागेवर पक्षातून इच्छुक असलेले किशोर गजभिये यांना पाठिंबा देण्यास सांगितले. अपमानित झालेल्या चहांदे यांनी 'वंचित'ला सोडचिठ्ठी देऊन, काँग्रेसची वाट धरली.

यवतमाळ-वाशिममध्ये तर पक्षावर वेगळीच नामुष्की ओढवली. पक्षाने खेमसिंग पवार यांना उमेदवारी जाहीर केली होती. मात्र, पवार यांनी माघार घेतल्यावर ऐनवेळी अभिजित राठोड यांना पक्षाने निवडणुकीच्या रिंगणात उतरवले. मात्र, अर्ज छाननीदरम्यान राठोड यांचा अर्ज बाद झाल्यावर पक्षाला अखेर समनक जनता पक्षाच्या अनिल राठोड यांना पाठिंबा द्यावा लागला.

जळगाव मतदारसंघातून पक्षाने प्रफुल्लकुमार लोढा यांना 'वंचित'ने उमेदवारी जाहीर केली; मात्र लोढा यांनी आपल्या उमेदवारीमुळे भाजपला थेट फायदा होण्याची शक्यता आहे, असे सांगून माघार घेतली.

**मागेल त्याला तिकीट....**

पक्षाकडून लोकसभा लढविण्यासाठी उमेदवारच मिळत नसल्याने जो कोणी इच्छुक पक्षाशी संपर्क करील त्यांना तिकीट मिळत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. याविषयी पक्षाची भूमिका जाणून घेण्यासाठी प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. पक्षातील एका नेत्याने याविषयी बोलताना सांगितले, 'उमेदवारी मागताना अनेक मोठे दावे केले जातात; परंतु जेव्हा निवडणूक पुढे जाते तसे विविध दबावांना उमेदवार बळी पडतात. एका प्रकरणात एक उमेदवार प्रलोभनासही बळी पडला आहे.

### हक्काच्या जागांवर 'काट' : सेनेला 'शह'

# शिंदेंची प्रतिष्ठा लावली पणाला, भाजपने खेचल्या 3 जागा

लोकशाही न्यूज नेटवर्क
ठाणे प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपात ठाण्याची जागा प्रतिष्ठेची जागा करुन भाजपने तीन जागा पदरात पाडून घेतल्या आहेत. शिंदेंच्या शिवसेनेला ठाण्याचा आवळा देऊन भाजपने तीन जागांचा कोहळा काढला आहे. ठाण्याची जागेचा विषय ताणून धरत भाजपने रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पालघर आणि दक्षिण मुंबई असे तीन मतदारसंघ खेचले आहेत. त्यामुळे मुंबई, कोकण पट्ट्यात शिंदेसेनेला तीन जागा गमवाव्या लागल्या आहेत.

भाजपने सुरुवातीपासूनच ठाण्यावर दावा सांगितला. इथे असलेल्या भाजपच्या ताकदीचा मुद्दा वारंवार अधोरेखित करण्यात आला. वातावरणनिर्मिती केली गेली. त्याचवेळी शिंदेसेनेच्या मातब्बर खासदारांची तिकिटे कापण्यास भाग पाडून दबावतंत्र वापरण्यास सुरुवात केली. शिवसेनेचा मुख्यमंत्री असताना ठाणे गमावले तर शिवसैनिकांमध्ये अतिशय चुकीचा संदेश जाईल या कल्पनेमुळे शिंदेसेनेत अस्वस्थतता निर्माण झाली.

ठाण्याचा विषय भाजपने ताणून धरल्याचे पाहून शिंदेंनी देखील डाव टाकण्यास सुरुवात केली. त्यांनी कल्याणमधून श्रीकांत शिंदेंची उमेदवारी जाहीर केली नाही. जोपर्यंत ठाण्याचा निर्णय होत नाही, तोपर्यंत कल्याणचा उमेदवार जाहीर करणार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली. शिंदेंच्या खेळीचा अंदाज आल्याने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रीकांत शिंदेंची उमेदवारी परस्पर जाहीर करुन टाकली. पण शिंदेंनी त्यांच्या लेकाची उमेदवारी अद्यापही अधिकृतपणे जाहीर केलेली नाही.

ठाण्यावरील दावा कायम ठेवायचा, तो अधिकाधिक भक्कम करायचा आणि त्या बदल्यात एकेक मतदारसंघ काढून घ्यायचा असा डाव भाजपने आखला. त्यानुसार रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातून शिंदेसेनेकडून मंत्री उदय सामंत यांचे बंधू किरण लढण्यास उत्सुक असताना, मतदारसंघावर त्यांचं वर्चस्व असतानाही भाजपनं ही जागा खेचून घेतली. इथून केंद्रीय मंत्री नारायण राणेंना उमेदवारी देण्यात आली.

# भक्तीचा फुलविता मळा, लागला लोकसभेचा लळा!

**जाण्या लोकसभेच्या दारी,
साधू – महंतांची मांदियाळी!
भक्तीचा फुलविता मळा,
लागला लोकसभेचा लळा!!**

**मन की बात**
दीपक कुलकर्णी
९९६०२१०३११

भक्तीचा मळा फुलविणारे साधू-संत सध्या निवडणुकांचे आखाडे गाजविण्यात मग्न झालेले दिसून येत आहेत. धर्माचा प्रचार-प्रसार करण्याचे काम करणारे साधू-संत आता लोकशाहीच्या मंदिरात सेवा करण्याच्या उद्देशाने आपले नशिब आजमिवण्यात दंग झालेले आहेत. पूर्वी साधू-संत राजकारणापासून कोसो दूर असतात मात्र सध्या साधू-संतांनाच राजकारणात येण्यासाठी पायघड्या घातल्या जात आहेत. राजकारण आणि धार्मिक ध्रूवीकरण हे जुने नाते आहेच! उत्तरप्रदेशात भारतीय जनता पक्षाने योगी आदित्यनाथ यांनी थेट मुख्यमंत्री करुन राजकारणात उडी घेण्यास भाग पाडले. योगी आदित्यनाथ यांचा तेथील संप्रदायावर असलेला पगडा भाजपसाठी फायदेशीर ठरत आहे. उत्तर महाराष्ट्रातील प्रसिद्ध असलेल्या नाशिक येथील निवडणुकीतही शांतिगिरी महाराजांनी उडी घेतल्याने अन्य पक्षांसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. शांतीगिरी महाराजांनी नाशिक लोकसभेसाठी अर्ज भरल्यानंतर आता साधू , महंत, महाराजही उतरले लोकसभेच्या आखाड्यात, अशी चर्चा सुरू झाली पण या साधू , महाराजांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरणे हे महाराष्ट्राला काही नवीन नाही. महाराष्ट्रात २००४ ते २०१९ या १५ वर्षांच्या काळात तब्बल आठ एक साधू , महंत, महाराजांनी लोकसभेची निवडणूक लढवली आहे. भाजपकडून २०१९ मध्ये सोलापुरातून निवडणूक लढवलेल्या श्री जय सिद्धेश्वर स्वामींनी तर मोठ्या फरकाने विजय मिळवत थेट दिल्ली गाठली होती. त्यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मुख्यमंत्री तसेच माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा पराभव केला होता. या निवडणुकीत प्रकाश आंबेडकरांनाही पराभूत व्हावे लागले होते. याच निवडणुकीत श्री वेंकटेश्वर महास्वामीजी अपक्ष म्हणून लढले होते मात्र त्यांना पराभव पत्करावा लागला होता. केवळ भारतीय जनता पक्षानेच नव्हे तर गत काळात बहुजन समाज पक्षाने देखील साधू , महंतांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले होते. बसपकडून २००९ मध्ये श्री महंत सुधीरदास महाराज यांनी नाशिकमधून निवडणूक लढवली होती. २०१४ मध्ये नगर येथून बहुजन मुक्ती पार्टीकडून निवडणूक लढलेल्या ह.भ.प. अजय बारसकर महाराज देखील रिंगणात होतेच!

२०१९ मध्ये जळगाव येथून हिंदुस्थान निर्माण दल या पक्षाकडून निवडणूक लढलेल्या संत श्री बाबा महाहंसजी महाराज पाटलांनी देखील नशिब आजमिवले होते, मात्र त्यांना पराभवाचे तोंड पाहवे लागले. मुंबई उत्तर येथून अखिल भारत हिंदू महासभा या पक्षाकडून निवडणूक लढलेल्या महंत श्रीराम स्वरूपदास महाराज अयोध्यावाले, मावळ येथून अपक्ष लढलेल्या ह.भ.प. आर. के. पाटील यांनीही आखाड्यात उडी घेतलीच होती. शांतीगिरी मौनगिरी महाराज पहिल्यांदाच नव्हे तर दुसऱ्यांदा लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. यापूर्वी त्यांनी २००९ मध्ये छत्रपती संभाजीनगरमधून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवली होती. त्या निवडणुकीत ते तिसऱ्या क्रमांकावर राहिले होते. यावेळी शांतीगिरी महाराज नाशिकमधून निवडणूक लढत आहेत. त्यांनी अर्ज देखील भरला आहे मात्र केवळ शांतिगिरी महाराजच नव्हे तर आणखी काही साधू, महंत नाशिकच्या आखाड्यात उतरण्यासाठी इच्छुक असल्याचे कळते. असो, राजकारणाची भुरळ प्रत्येकाला असते, तशी ती साधू-संतांना देखील पडली आहे. धार्मिक कार्यात सातत्याने सक्रीय असलेल्या साधू-संतांचा जनसंपर्क चांगला असल्याने ते त्याचा फायदा घेण्याच्या प्रयत्नात असतात, तो फायदा त्यांना होती की नाही, हे माहित नाही मात्र साधू-संतांनी खांद्यावर घेतलेली 'लोकशाही'ची ही पताका मनाला स्पर्श करुन जाते एवढेच!




हे पत्र लोकशाही इनोवेशन्स प्रायव्हेट लिमिटेड मालकीचे त्यांच्या वतीने मुद्रक, प्रकाशक, संपादिका शांता कमलाकर वाणी यांनी लोकशाही इनोवेशन्स प्राइवेट लिमिटेड एम-१८१, एमआयडीसी जळगाव जिल्हा जळगाव ४२५००२ (महाराष्ट्र) येथून छापून २२०, बळीराम पेठ, जळगाव जिल्हा जळगाव ४२५००१ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले.
This LOKSHAHI newspaper is owned by Lokshahi Innovations Private Limited and printed on its behalf by Shanta Kamalakar Wani, Printer, Publisher, Editor at Lokshahi Innovations Private Limited M-181, MIDC Jalgaon District Jalgaon 425002 (Maharashtra). Published at 220, Baliram Peth, Jalgaon District Jalgaon 425001 Maharashtra.आर.एन.आय.नं MAHMAR/२००९/३३०२८ पोस्टल रजी. नंबर - No.JAL/16/2021-23 EMail- lokshahilive@gmail.com, वर्ष १५ वे. जळगाव फोन नं. ०२५७-२२३७४९१,२२४१४९१,२९७०३६८.
संपर्क कार्यालय: मुंबई- १०, शंकेश्वर सोसायटी, मानपाडा रोड, नवजीवन हॉस्पीटल समोर, डोंबीवली पूर्व जि. ठाणे, मो. नं. ९४२२२८४५११. सहाय्यक संपादक राजेश यावलकर, सल्लागार संपादक धों. ज. गुरव, (पी. आर. बी. कायद्यानुसार) संपादकीय जबाबदारी यांची आहे.